**पाहिजेत**

**ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन, 12 वी पास पाहिजेत**

नामांकित कंपनी साठी सबस्टेशन कामासाठी शिक्षण ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन, 12 वी पास फ्रेश/अनुभवी मुले त्वरित पाहिजे.

**संपर्क - 9923155996**



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com

www.katusatyanews.com



महाराष्ट्र शासन MSBSVET, MSSDS, YCMOU, ITS, Skill India मान्यता प्राप्त

**पाटील इलेक्ट्रॉनिक्स इन्स्टिट्यूट सातारा**

Email : patilinstitutesatara@gmail.com

महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई बोर्डाच्या कोर्सेसना प्रवेश

सर्टीफिकेट कोर्सेसना प्रवेश : पात्रता - 10 वी, 12 वी पास/ नापास व कॉलेजचे विद्यार्थी

- इलेक्ट्रिकल सुपरवायझर
- ऑटोमोबाईल टेक्निशियन
- इलेक्ट्रिकल वायरमन
- मोटार वायडिंग
- टू-व्हीलर मेकॅनिक
- फोर व्हीलर मेकॅनिक
- A.C. मेकॅनिक
- वेल्डर / प्लंबर
- कॉम्प्युटर ऑपरेटर
- कॉम्प्युटर हार्डवेअर

एस. टी. पास, लायसेन्स व प्लेसमेंटची सोय

प्लॉट नं. ११, राधिका रोड, एस.टी. स्टॅण्डजवळ, सातारा.

प्रवेशासाठी संपर्क : 9822097071 / 7709509500



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २१ वे, अंक २७ वा | बुधवार, दि. १२ ऑगस्ट २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना २ लाख द्या, शक्तिपीठ महामार्ग रद्द करा

## ‘स्वाभिमानी’च्या राज्य कार्यकारिणी बैठकीत १२ ठराव

## शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थी आणि वीजप्रश्नांवर सरकारला घेरण्याचा निर्धार

**पुणे (कटूसत्य वृत्त):-** नियमितपणे पीक कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना दोन लाख रुपये प्रोत्साहनपर अनुदान द्यावे, राज्यातील जनतेवर तब्बल १ लाख १० हजार कोटी रुपयांचा बोजा टाकणारा शक्तिपीठ महामार्ग रद्द करावा, गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेतील विमा संरक्षण दोन लाखांवरून पाच लाख रुपये करावे, तसेच द्राक्ष, ग्रीन हाऊस आणि शेडनेट शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचे १० लाख रुपयांपर्यंतचे थकीत कर्ज माफ करावे, अशा विविध मागण्यांचे १२ ठराव स्वाभिमानी शेतकरी संघटना आणि स्वाभिमानी पक्षाच्या राज्य कार्यकारिणी बैठकीत करण्यात आले.

पुणे (किवळे) येथे दोन दिवस सुरू असलेल्या स्वाभिमानी शेतकरी संघटना आणि स्वाभिमानी पक्षाच्या राज्य कार्यकारिणी बैठकीची सांगता झाली. संघटनेचे संस्थापक-अध्यक्ष राजू शेट्टी यांच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीस राज्य, जिल्हा आणि तालुका पातळीवरील प्रमुख पदाधिकारी तसेच कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते. पहिल्या दिवशी राज्यातील विविध जिल्ह्यांतील संघटनात्मक परिस्थितीचा आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांचा आढावा घेण्यात आला. त्यानंतर दोन दिवस झालेल्या सविस्तर चर्चेतून शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थी, वीज, साखर उद्योग तसेच राज्यातील महत्त्वाच्या प्रश्नांवर सरकारचे लक्ष वेधण्यासाठी १२ ठराव मंजूर करण्यात आले.

**नियमित कर्जदारांना दोन लाखांचे प्रोत्साहन अनुदान**

शेतकऱ्यांनी नियमितपणे कर्जाची परतफेड केली तर त्यांना कोणताही लाभ मिळत नाही आणि कर्जबुडव्यांना मात्र कर्जमाफीच्या माध्यमातून दिलासा मिळतो, अशी परिस्थिती निर्माण होऊ नये. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांनाही शासनाने प्रोत्साहन दिले पाहिजे. त्यामुळे नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना दोन लाख रुपये प्रोत्साहनपर अनुदान देण्यात यावे, अशी मागणी बैठकीत करण्यात आली.

पीक कर्जाव्यतिरिक्त खावटी, किसान सहाय्य आणि आकस्मित स्वरूपाच्या मध्यम मुदत कर्जावर बँकांकडून आकारण्यात येणारा १२ ते १३ टक्के व्याजदर शेतकऱ्यांसाठी अन्यायकारक असल्याचे संघटनेने म्हटले आहे. या कर्जाचा व्याजदर सात टक्क्यांपर्यंत कमी करण्यात यावा, असा ठरावही करण्यात आला.



**शेतकरी अपघात विमा पाच लाखांवर करा**

शेतात काम करताना अपघात होऊन शेतकऱ्याचा मृत्यू अथवा गंभीर अपघात झाल्यास कुटुंब आर्थिक संकटात सापडते. त्यामुळे गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेतील विमा रक्कम दोन लाखांवरून पाच लाख रुपये करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली.

त्याचबरोबर शेतात काम करताना शेतकरी किंवा शेतमजुराला सर्पदंश झाल्यास त्यांना २५ लाख रुपयांची मदत देण्यात यावी, असा महत्त्वपूर्ण ठरावही करण्यात आला.

**शेतमजुरांसाठी स्वतंत्र महामंडळाची मागणी**

बांधकाम कामगार कल्याण मंडळाच्या धर्तीवर राज्यात शेतमजूर कल्याण महामंडळ स्थापन करण्यात यावे, अशी मागणी स्वाभिमानीने केली आहे. शेतीच्या अर्थव्यवस्थेतील महत्त्वाचा घटक असलेल्या शेतमजुरांना सामाजिक सुरक्षा, आर्थिक मदत आणि विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मिळण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा असणे गरजेचे असल्याचे संघटनेने स्पष्ट केले.

**‘सत्तेच्या आमिषाला बळी पडणार नाही’**

बैठकीला संबोधित करताना स्वाभिमानीचे संस्थापक-अध्यक्ष राजू शेट्टी यांनी संघटनेची भूमिका स्पष्ट केली. शेतकऱ्यांच्या हक्कासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेने कायम रस्त्यावर उतरून संघर्ष केला आहे. सत्तेच्या आमिषाला बळी न पडता आगामी काळातही केवळ बळीराजाच्या हितासाठी लढा सुरूच ठेवण्यात येईल, असे शेट्टी यांनी स्पष्ट केले. शेतकरी, शेतमजूर आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेशी संबंधित प्रश्नांवर शासनाने तातडीने निर्णय घ्यावा. अन्यथा शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी संघटनेच्या माध्यमातून पुन्हा एकदा राज्यव्यापी आंदोलन उभारण्यात येईल, असा इशाराही बैठकीतून देण्यात आला.

**शक्तिपीठ महामार्ग रद्द करण्याची मागणी**

राज्यातील जनतेवर तब्बल १ लाख १० हजार कोटी रुपयांचा आर्थिक बोजा टाकणारा आणि गरज नसलेला शक्तिपीठ महामार्ग रद्द करण्यात यावा, असा ठराव स्वाभिमानीच्या बैठकीत करण्यात आला. या महामार्गामुळे शेतजमिनी, शेती आणि ग्रामीण भागातील नागरिकांच्या जीवनावर परिणाम होणार असल्याने शासनाने या प्रकल्पाचा पुनर्विचार करावा, अशी भूमिका संघटनेने घेतली.

**भारत-अमेरिका मुक्त व्यापार कराराला विरोध**

देशातील शेती आणि शेतकऱ्यांचे हित जपण्याबरोबरच देशाची अन्नसुरक्षा अबाधित ठेवण्यासाठी भारत-अमेरिका मुक्त व्यापार करार करण्यात येऊ नये, असा ठराव बैठकीत करण्यात आला. अशा करारामुळे देशांतर्गत शेतीमालाच्या बाजारपेठेवर परिणाम होण्याची शक्यता असून भारतीय शेतकऱ्यांच्या हिताचे संरक्षण करणे आवश्यक असल्याची भूमिका संघटनेने मांडली.

**साखर आयातीचा निर्णय घेऊ नका**

२०२६-२७च्या हंगामात देशाच्या गरजेपुरते साखरेचे उत्पादन होण्याची शक्यता आहे. तसेच सध्या उपलब्ध असलेला साखरेचा साठाही नवीन हंगाम सुरू होईपर्यंत पुरेसा असल्याने केंद्र सरकारने साखर आयात करण्याचा निर्णय घेऊ नये, अशी मागणी स्वाभिमानीने केली आहे. साखर आयातीचा निर्णय घेतल्यास देशातील साखर उद्योग आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांवर त्याचा परिणाम होऊ शकतो, अशी संघटनेची भूमिका आहे.

**विद्यार्थ्यांना तीन टक्के व्याजदराने विनातारण कर्ज**

उच्च शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागू नये, यासाठी विद्यार्थ्यांना विनातारण केवळ तीन टक्के व्याजदराने शैक्षणिक कर्ज उपलब्ध करून द्यावे, असा ठरावही करण्यात आला.

**सौर पंपधारकांना नेट मीटरिंगसह १२ तास वीज**

शेतीपंपांना वीज जोडणी देताना सौर पंपाचा वीजपुरवठा नेट मीटरिंगशी जोडण्यात यावा आणि शेतकऱ्यांना नियमित १२ तास वीजपुरवठा करण्यात यावा, अशी मागणीही बैठकीत करण्यात आली. शेतीसाठी दिवसा आणि पुरेशा वेळेत वीज उपलब्ध न झाल्याने शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागते. या पार्श्वभूमीवर सौर ऊर्जेचा प्रभावी वापर करून वीजपुरवठ्याची समस्या सोडवावी, अशी भूमिका संघटनेने घेतली.

**विधानपरिषद निवडणुकीत ग्रामपंचायत सदस्यांनाही मतदानाचा अधिकार द्या**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतदारसंघातून होणाऱ्या विधानपरिषद निवडणुकीत पंचायत समिती सदस्य आणि ग्रामपंचायत सदस्यांनाही मतदानाचा अधिकार देण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली. कर्नाटक राज्याच्या धर्तीवर महाराष्ट्रातही ही व्यवस्था लागू करावी, असा ठराव बैठकीत मंजूर करण्यात आला.

**द्राक्ष, ग्रीन हाऊस, शेडनेट शेतकऱ्यांनाही कर्जमाफी द्या**

राज्य सरकारने जाहीर केलेल्या अहिल्यादेवी कर्जमाफी योजनेमध्ये द्राक्ष उत्पादक, ग्रीन हाऊस आणि शेडनेट शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचाही समावेश करण्यात यावा. या शेतकऱ्यांचे १० लाख रुपयांपर्यंतचे थकीत कर्ज माफ करावे, तसेच उपसा सिंचन योजनांशी संबंधित अनुदान आणि कर्जाचाही कर्जमाफीमध्ये समावेश करावा, असा ठराव करण्यात आला.

## महालक्ष्मी देवीची त्रिवार्षिक यात्रा १२ ऑगस्टला

### १ हजार सुवासिनींची जलकुंभ मिरवणूक

### ३० हजार भाविकांसाठी महाप्रसाद



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सिव्हील हॉस्पिटल परिसरातील श्री महालक्ष्मी मंदिराची त्रिवार्षिक आषाढ यात्रा बुधवार, १२ ऑगस्ट रोजी होणार आहे. यानिमित्त मंगळवार, ११ ऑगस्ट रोजी दुपारी ४ वाजता बलिदान चौकातील हुतात्मा स्तंभापासून १ हजार सुवासिनींची जलकुंभासह मिरवणूक काढण्यात येणार असल्याची माहिती श्री महालक्ष्मी मंदिर ट्रस्ट व सोलापूर शहर वीरशैव लिंगायत गवळी समाजाच्या वतीने ट्रस्टचे अध्यक्ष अनिल गवळी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

मिरवणूक बलिदान चौक, मंगळवार पेठ पोलीस चौकी, माणिक चौक, दत्त चौक, लक्ष्मी मार्केट, पंचकट्टा, जिल्हा परिषद, गुरुभेट, रंगभवनमार्गे सिव्हील हॉस्पिटल परिसरातील महालक्ष्मी मंदिरापर्यंत जाणार आहे. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर पावसासाठी महालक्ष्मी मातेला साकडे घालण्यात येणार आहे. यात्रेच्या दिवशी पहाटे ५ वाजता केशव झिपरे यांच्या हस्ते महालक्ष्मी मातेला पंचामृत अभिषेक होईल. सकाळी ११ ते रात्री ९ वाजेपर्यंत मंदिरालगतच्या शामियान्यात सुमारे ३० हजार भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. गवळी समाजाच्या पारंपरिक श्रद्धेचा भाग म्हणून वाद्यांच्या निनादात म्हशी पळविण्याचा कार्यक्रमही होणार आहे.

यात्रेनिमित्त वृक्षारोपण तसेच शासकीय रुग्णालयात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. समाजबांधवांनी रक्तदान करून सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले.

शहर व जिल्ह्यातील भाविकांनी यात्रेत सहभागी होऊन सहकार्य करावे, असे आवाहन यात्रा समितीच्या वतीने अनिल गवळी यांनी केले.

यात्रा यशस्वी करण्यासाठी देवबा डोईजोडे, अनिल संभाजी गवळी, केशव झिपरे, प्रभाकर जानगवळी, पांडुरंग परळकर, वसंत पंगुडवाले, कृष्णात झिपरे, सुरेश जानगवळी, राजेश बहिरवाडे, शिवा भास्कर, दिलीप भास्कर, अशोक कलागते, देवा अंजीखाने, सुरेश कलागते, नागा खंडेराव, गोरख घुले, संजू शहापूरकर, टिनू अंजीखाने, महादेव बडवणे, योगेश झिपरे, प्रशांत झिपरे यांच्यासह समाजबांधव परिश्रम घेत आहेत.

या पत्रकार परिषदेस संभाजी झिपरे, पांडुरंग परळकर, प्रभाकर जानगवळी, ज्ञानेश्वर अंजीखाने, वसंत पंगुडवाले, केशव झिपरे, योगेश झिपरे आदी उपस्थित होते.

## TET पेपरफुटी : सोलापुरातून प्रशिक्षण केंद्र चालकाला अटक

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शिक्षक पात्रता परीक्षा अर्थात TET पेपरफुटी प्रकरणाचे महाराष्ट्र कनेक्शन समोर आले आहे. खासगी पोलीस प्रशिक्षण आणि स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र चालवणाऱ्या प्रकाश पवार याला सोलापुरातून अटक करण्यात आली आहे.

TET पेपरफुटीचे तपास करणाऱ्या विशेष पथकाने सोलापुरातून प्रकाश पवार याला अटक केली आहे. भिवंडी पोलिसांनी ही कारवाई केली. याप्रकरणी आतापर्यंत 16 जणांना अटक करण्यात आली आहे. या घडामोडींमुळे सोलापूरमधील परीक्षार्थी उमेदवारांमध्ये खळबळ उडाली आहे.



सोलापुरातील कुमठे गावात प्रकाश पवार हा ध्रुव प्रतिष्ठान नावाने खासगी पोलीस प्रशिक्षण केंद्र चालवत होता. जवळपास 15-20 वर्षांपासून तो विद्यार्थ्यांना पोलीस भरती आणि विविध स्पर्धा परीक्षासाठी मार्गदर्शन करणारी अकॅडमी चालवतो. TET पेपरफुटी प्रकरणात या आधी अटकेत असलेल्या आरोपीशी प्रकाश पवार हा संपर्कात होता तसेच काही विद्यार्थ्यांची कागदपत्रे देखील त्याने मुख्य आरोपीना दिल्याची प्राथमिक माहिती आहे प्रकाश पवार याचा या पेपर फुटी प्रकरणात नेमका संबंध काय होता ? विद्यार्थ्यांची कागदपत्रे त्याने आरोपीना का दिली याचा तपास सध्या पोलिसांमार्फत सुरू आहे. भिवंडी येथे टीईटी परीक्षेची प्रश्नपत्रिका फुटली. त्यानंतर ही परीक्षा रद्द (पान 2 वर..)

## अक्कलकोटमध्ये जिल्हा परिषद शाळेच्या वरांड्याचा स्लॅब कोसळला

### १३ विद्यार्थी आणि २ शिक्षक जखमी

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्यातील अक्कलकोट तालुक्यातील बबलाद येथील जिल्हा परिषद प्राथमिक कन्नड शाळेत मंगळवारी सकाळी जिल्हा परिषद प्राथमिक कन्नड शाळेच्या वरांड्याचे कॉँक्रीटचे छत (स्लॅब) अचानक कोसळले.

या दुर्घटनेत १३ विद्यार्थी आणि २ शिक्षक जखमी झाले आहेत. सुदैवाने मोठी जीवितहानी टळली असली, तरी या घटनेमुळे संपूर्ण परिसरात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

बबलाद येथे जिल्हा परिषदेची इयत्ता पहिली ते सातवी पर्यंतची कन्नड माध्यमाची प्राथमिक शाळा आहे. २५० पेक्षा अधिक विद्यार्थी या शाळेत शिकतात. मंगळवारी सकाळी शाळेची सकाळची प्रार्थना पार पडली. प्रार्थनेनंतर सर्व विद्यार्थी रांगेने आपापल्या वर्गाच्या दिशेने जात होते. त्याच वेळी वरांड्यातील कॉँक्रीटच्या छताचा मोठा भाग अचानक खाली कोसळला. थेट विद्यार्थ्यांच्या आणि शिक्षकांच्या अंगावर ढिगारा पडल्याने शाळेच्या आवारात एकच घबराट आणि धावपळ उडाली. घटनेचे गांभीर्य ओळखून उपस्थित शिक्षकांनी आणि स्थानिक ग्रामस्थांनी तातडीने मदतकार्य सुरू केले. ढिगाऱ्याखाली अडकलेल्या विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना बाहेर काढले.



त्यामध्ये रमेश शिवमूर्ती व भीमण्णा गवळी हे दोन शिक्षक व १३ विद्यार्थी जखमी झाले आहेत. ४ विद्यार्थ्यांच्या डोक्याला खोच पडली. तर, दोघांच्या कपाळाला खोच पडली आहे. जवळच्या प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये जखमी विद्यार्थी व शिक्षकांना उपचारासाठी दाखल करण्यात आले. सर्वांची प्रकृतीस्थिर असून मलमपट्टी, औषधोपचार करून विद्यार्थ्यांना घरी सोडण्यात आल्याची माहिती, गटशिक्षणाधिकारी प्रशांत अरबाळे यांनी दिली.

अक्कलकोट तालुक्यात एकूण २३५ शाळांमधील १२८ वर्गखोल्या धोकादायक आहेत. त्यामध्ये यावर्गखोलीचा समावेश नाही. शिक्षक-मुख्याध्याकांच्या नियमीत बदली होतात, त्यामुळे दुर्घटना घडलेल्या शाळेची इमारत नेमकी कधी बांधली होती, याबाबतची माहिती शाळेच्या सध्याच्या मुख्याध्यापककडे नाही. दुर्घटना घडलेल्य शाळेची ती इमारत प्रत्यक्षदर्शी सुस्थितीत दिसत असली तरी प्रत्यक्षात अंतर्गत नादुरुस्ती हे स्ट्रक्चरल ऑडीटमध्ये समोर येईल. **- प्रशांत अरबाळे,** गटशिक्षणाधिकारी, अक्कलकोट

**शाळांच्या सुरक्षेचा आणि निकृष्ट बांधकामाचा प्रश्न ऐरणीवर**

या दुर्घटनेमुळे जिल्हा परिषदेच्या शाळांच्या इमारतींची दुरवस्था आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. जुन्या आणि धोकादायक इमारतींचे वेळेत ‘स्ट्रक्चरल ऑडिट’ व दुरुस्ती का केली जात नाही, असा संतप्त सवाल पालक आणि ग्रामस्थांकडून विचारला जात आहे. संबंधित दोषी अधिकारी आणि ठेकेदारांवर कडक कारवाई करावी, तसेच जिल्ह्यातील सर्व जिल्हा परिषद शाळांच्या इमारतींची तात्काळ सुरक्षा तपासणी करावी, अशी जोरदार मागणी आता जोर धरू लागली आहे.

## पंढरपूर कॉरिडॉरला भाजप नेते सुब्रमण्यम स्वामींचा विरोध

### थेट मुख्यमंत्री फडणवीसांना दिला इशारा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पंढरपूर कॉरिडॉर आणि विकास आराखड्यासंदर्भात झालेल्या मंत्रिमंडळ शिखर समितीच्या बैठकीत पंढरपूर कॉरिडॉरला मंजुरी देण्यात आली आहे. 1 ऑगस्टपर्यंत भूसंपादन आणि बाकीची प्रक्रिया पूर्ण करण्याच्या सूचनाही या बैठकीत देण्यात आल्या होत्या.

त्यानुसार, कामाला सुरुवात झाली आहे. मात्र, या पंढरपूर कॉरिडॉरला माजी खासदार तथा भाजपचे ज्येष्ठ नेते डॉ. सुब्रमण्यम स्वामी यांनी विरोध केला आहे. महत्त्वाची बाब म्हणजे, सुब्रमण्यम स्वामी यांनी केवळ विरोधच केला नाहीये तर त्यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना इशारा दिला आहे. कॉरिडॉर विरोधात मी कोर्टात केस केली तर त्यांचे काय हाल होतील ? असे म्हणत स्वामींनी याबाबत आपली स्पष्ट प्रतिक्रिया दिली आहे.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचा ड्रिम प्रोजेक्ट असलेल्या पंढरपूर कॉरिडॉरबाबत आपली भूमिका स्पष्ट करताना माजी खासदार सुब्रमण्यम स्वामी म्हणाले आहेत की, पंढरपूर (पान 2 वर..)




## संपादकीय

# डिजिटल व्यवहारांवर कराची टांगती तलवार

गेली काही वर्षे 'डिजिटल इंडिया' मोहिमेचा गाजावाजा करून कोट्यवधी भारतीयांना ऑनलाइन पेमेंटची सवय लावल्यानंतर आता चोरपावलांनी त्यावर शुल्क आकारणीचा घाट सरकारने घातला आहे. विद्यार्थ्यांवरील लाठीमार आणि पेपरफुटीसारख्या मुद्द्यांवर संसदेत गदारोळ सुरू असतानाच सरकारने संसदेत कर आकारणी व इतर कायदे (दुरुस्ती)२०२६ हे विधेयक हळूच विनाचर्चा संमत करवून घेतले आहे.

अगदी भाजी विक्रेत्यांपासून कोट्यधीशांपर्यंत सर्वत्र सवयीचे झालेल्या 'युनिफाइड पेमेंट इंटरफेस'च्या (यूपीआय) व्यवहारांवर शुल्क लागू करण्याचे अधिकार त्यातून सरकारला मिळाले आहेत. हे शुल्क कोणत्या दराने आणि कोणावर लागू होणार, हे अद्याप निश्चित झालेले नाही; तसेच सध्या त्याचे प्रमाण अत्यल्प असून दोन हजार रुपयांपेक्षा अधिक रकमेच्या व्यापारी व्यवहारांवरच ते आकारण्यात येईल, अशी चर्चा आहे. मात्र, व्यापाऱ्यांकडून या शुल्काचा बोजा अंतिमतः ग्राहकांवरच पडणार आहे, हे वेगळे सांगण्याची गरज नाही आणि या विधेयकामुळे भविष्यात या शुल्काची टांगती तलवार सर्वांवरच उभी आहे, हे निश्चित. आवर्जून प्रोत्साहन दिलेल्या डिजिटल क्रांतीचे घड्याळ उलटे फिरवण्याचाच हा प्रयत्न असल्यामुळे हे शुल्क म्हणजे फसवणूक असल्याची भावना सर्वसामान्यांमध्ये निर्माण होणे साहजिक आहे. त्यातून नागरिक पुन्हा रोखीच्या व्यवहारांकडे वळल्यास नवल नाही.

अनेक वर्षे देशात डेबिट आणि क्रेडिट कार्डावर 'मर्चंट डिस्काउंट रेट'ची (एमडीआर) आकारणी करण्यात येत असे. सन २०१६ मध्ये नोटाबंदी केल्यानंतर ऑनलाइन व्यवहारांना देशात चालना मिळाली. त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी हरेक प्रयत्न झाले. मात्र, सन २०२० मध्ये या 'यूपीआय' व्यवहारांवरील 'एमडीआर' रद्द करणे, हा या डिजिटल व्यवहारांना गती देण्यातील सर्वांत महत्त्वाचा निर्णय ठरला. त्याबरोबरच 'क्यूआर कोड' स्कॅन करून पैसे देण्याची सुलभ सुविधा सर्वसामान्यांच्या हाती आल्यामुळे ऑनलाइन व्यवहारांची क्रांती झाली.

गेल्या वर्षी देशात २४ हजार १६१ कोटी ही 'यूपीआय' व्यवहारांची संख्या, हे ही व्यवस्था तळागाळापर्यंत झिरपल्याचे निदर्शक आहे. आता या व्यवहारांवर शुल्काचा बडगा उगारण्यात आला आहे. 'यूपीआय' सेवा पुरवणे, त्यासाठी पायाभूत सुविधा आणि या सेवा सक्षम करण्यासाठी येणारा खर्च सध्या संबंधित बँका आणि सेवा पुरवठादारांकडून केला जातो व त्यावर सरकारकडून काही प्रमाणात अनुदान दिले जाते. मात्र, हा खर्च दिवसेंदिवस वाढत असून ही सेवा सक्षम करण्यासाठी शुल्क आकारणीसाठी बँका व फिनटेक कंपन्यांचा मोठा दबाव होता; त्यावर या विधेयकाद्वारे संमतीची मोहोर उमटवली आहे. रिझर्व्ह बँकेकडून अप्रत्यक्षपणे या शुल्काचे समर्थन करण्यात येत असून, अर्थमंत्री किंवा सरकारच्या वतीने यावर अद्याप भाष्य नाही. त्यामुळे संभ्रम कायम आहे. सध्या दोन हजार रुपयांवरील व्यापारी व्यवहारांवर एका टक्क्याहून कमी शुल्क लागू होऊ शकते, असे 'सूत्रे' सांगत आहेत.

प्रथम मोफत सुविधा देण्याचे आमिष दाखवून ग्राहकांना आकर्षित करून घेणे आणि ग्राहक त्यांच्या आधीन गेल्यानंतर मनमानी शुल्कआकारणी करून मक्तेदारी निर्माण करणे, हे बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या नफेखोरीचे सूत्र. मात्र, जनकल्याणाची भाषा करणाऱ्या सरकारकडून हे नक्कीच अपेक्षित नाही. प्रारंभी नोटबंदी करून रोख व्यवहारांच्या नाड्या आवळणे, नंतर रोख व्यवहारांवर मयार्ता आणि एटीएम व्यवहारांवर शुल्कआकारणी, ही डिजिटल व्यवहारांसाठी अघोषित सक्तीच होती, आता त्यावरही शुल्काची आकारणी अयोग्यच आहे.

अमेरिका व चीनसारख्या देशांत अशा शुल्कांमुळे नागरिक पुन्हा रोखीकडे वळल्याचा इतिहास आहे; भारतातही काही पाहण्यांमध्ये असे शुल्क लागू झाले, तर 'यूपीआय' बंद करू,' असे ७३ टक्के ग्राहक म्हणतात, याची दखल सरकारने घेतली पाहिजे. आधीच किमान शिलकीचा दंड, डेबिट कार्डावर वार्षिक शुल्क, एटीएम व्यवहारांवर शुल्क, चेकबुक शुल्क, चेक बाउन्स दंड यापासून खाते बंद करण्यावरही शुल्कआकारणी, या बँकांच्या नफेखोरीला ग्राहक वैतागले आहेत, त्यात ही नवी भर. बरे, नव्या शुल्कातून प्रारंभी सुमारे पाच ते दहा हजार कोटी मिळू शकतात; गेल्या वर्षी रिझर्व्ह बँकेने आपल्या नफ्यातून सरकारला दोन लाख कोटी रुपये लाभांश दिला, त्या तुलनेत ही शुल्कवसुली म्हणजे दात कोरून पोट भरण्याचाच प्रकार झाला. त्यामुळेच या शुल्काबाबत सरकारने जनतेला विश्वासात घेऊन त्याचा भार सर्वसामान्य ग्राहकांवर पडणार नाही, याची स्पष्ट हमी दिली पाहिजे.

# युवाशक्ती : राष्ट्रनिर्मितीची नवी दिशा

दरवर्षी १२ ऑगस्ट हा दिवस जगभरात 'आंतरराष्ट्रीय युवा दिन' म्हणून साजरा केला जातो. युवक हे कोणत्याही देशाचे वर्तमान आणि भविष्य घडविणारे सर्वांत महत्त्वाचे घटक मानले जातात. तरुणाईमध्ये असलेली ऊर्जा, कल्पकता, धाडस, परिवर्तनाची आस आणि नव्या वाटा शोधण्याची क्षमता समाजाच्या प्रगतीला नवी दिशा देऊ शकते. त्यामुळे युवा दिन हा केवळ युवकांच्या गौरवाचा दिवस नसून, त्यांच्या प्रश्नांचा, अपेक्षांचा, संधींचा आणि जबाबदाऱ्यांचा गांभीर्याने विचार करण्याचा दिवस आहे. जगातील सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय आणि तांत्रिक परिवर्तनामध्ये युवकांची भूमिका दिवसेंदिवस अधिक महत्त्वाची होत आहे. भारतासारख्या तरुण लोकसंख्या मोठ्या प्रमाणात असलेल्या देशासाठी तर युवाशक्ती ही विकासाची सर्वांत मोठी भांडवलशक्ती आहे. या शक्तीला योग्य शिक्षण, कौशल्य, रोजगार, समान संधी आणि सकारात्मक दिशा मिळाली, तर भारत अधिक सक्षम, समृद्ध आणि न्याय्य राष्ट्र म्हणून जगासमोर उभा राहू शकतो.

आंतरराष्ट्रीय युवा दिनाची सुरुवात युवकांशी संबंधित प्रश्नांकडे जागतिक पातळीवर लक्ष वेधण्यासाठी झाली. संयुक्त राष्ट्रसंघाने युवकांच्या सामाजिक सहभागाला, त्यांच्या हक्कांना आणि विकासातील योगदानाला महत्त्व देत या दिवसाला विशेष स्थान दिले. जगभरातील युवकांना भेडसावणाऱ्या शिक्षण, रोजगार, गरिबी, असमानता, मानसिक ताण, सामाजिक बहिष्कार, हवामान बदल, डिजिटल परिवर्तन आणि शांतता-सुरक्षा यांसारख्या प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी हा दिवस महत्त्वपूर्ण ठरतो. युवकांना केवळ भविष्यातील नागरिक म्हणून पाहण्याऐवजी वर्तमानातील सक्रिय भागीदार म्हणून स्वीकारणे ही काळाची गरज आहे. त्यांच्या मतांना स्थान देणे, निर्णयप्रक्रियेत त्यांचा सहभाग वाढविणे आणि त्यांच्या सर्जनशीलतेला प्रोत्साहन देणे हे आधुनिक लोकशाहीचे महत्त्वाचे लक्षण आहे.

भारताच्या संदर्भात युवकांचे महत्त्व अधिक व्यापक आहे. देशाची मोठी लोकसंख्या तरुण आहे. त्यामुळे भारताकडे जगातील सर्वांत मोठ्या युवा शक्तींपैकी एक शक्ती उपलब्ध आहे. ही लोकसंख्यात्मक स्थिती भारतासाठी मोठी संधी आहे; मात्र ती आपोआप विकासाचे साधन ठरत नाही. युवकांना दर्जेदार शिक्षण, बाजारपेठेला अनुरूप कौशल्ये, रोजगाराच्या संधी, उद्योजकतेसाठी अनुकूल वातावरण आणि सामाजिक सुरक्षितता मिळाली तरच ही लोकसंख्यात्मक संधी आर्थिक व सामाजिक प्रगतीमध्ये रूपांतरित होऊ शकते. अन्यथा बेरोजगारी, अपुरी रोजगारक्षमता, आर्थिक असुरक्षितता आणि सामाजिक निराशा या समस्या निर्माण होऊ शकतात. म्हणूनच 'तरुण भारत' ही संकल्पना केवळ लोकसंख्येच्या आकडेवारीपुरती मर्यादित न राहता सक्षम, सुशिक्षित, कुशल, संवेदनशील आणि जबाबदार भारताच्या निर्मितीशी जोडली पाहिजे.

युवकांच्या विकासामध्ये शिक्षणाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. शिक्षण म्हणजे केवळ पदवी मिळविण्याचे साधन नव्हे, तर व्यक्तिमत्त्व विकास, विवेकशील विचार, वैज्ञानिक दृष्टिकोन, सामाजिक जाणीव आणि नैतिक मूल्यांची निर्मिती करणारी प्रक्रिया आहे. आजच्या बदलत्या जगात पारंपरिक ज्ञानाबरोबरच तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, माहिती-तंत्रज्ञान, संवादकौशल्य, समस्या सोडविण्याची क्षमता, सर्जनशीलता आणि उद्योजकता यांसारख्या कौशल्यांची गरज वाढत आहे. त्यामुळे युवकांना केवळ परीक्षाभिमुख शिक्षण देण्याऐवजी ज्ञान आणि कौशल्य यांचा समन्वय साधणारे शिक्षण देणे आवश्यक आहे. मातृभाषेतून गुणवत्तापूर्ण शिक्षण, उच्च शिक्षणाच्या समान संधी आणि ग्रामीण व वंचित विद्यार्थ्यांपर्यंत डिजिटल साधनांची उपलब्धता यांना विशेष महत्त्व द्यावे लागेल.

आजच्या युवकांसमोरील सर्वांत मोठ्या आव्हानांपैकी रोजगाराचे आव्हान महत्त्वाचे आहे. शिक्षण पूर्ण केल्यानंतरही अनेक तरुणांना त्यांच्या पात्रतेनुसार रोजगार मिळत नाही. काही युवकांना रोजगार मिळतो; परंतु त्यांना त्यांच्या कौशल्यांच्या तुलनेत कमी उत्पन्न किंवा अस्थिर रोजगार स्वीकारावा लागतो. ग्रामीण भागातील युवकांसाठी ही समस्या अधिक गंभीर आहे. शेतीवरील वाढता आर्थिक दबाव, मर्यादित औद्योगिक संधी आणि शहरांकडे होणारे स्थलांतर यामुळे ग्रामीण तरुणांसमोर अनेक प्रश्न उभे राहतात. त्यामुळे स्थानिक पातळीवर रोजगारनिर्मिती, कौशल्यविकास, कृषीपूरक व्यवसाय, लघुउद्योग, स्वयंरोजगार आणि सामाजिक उद्योजकतेला प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. प्रत्येक तरुणाने सरकारी नोकरीचीच अपेक्षा करण्याऐवजी रोजगार निर्माण करणारा उद्योजक होण्याची संधीही समाजाने उपलब्ध करून दिली पाहिजे.

डिजिटल क्रांतीने युवकांसमोर अभूतपूर्व संधी निर्माण केल्या आहेत. आज एका छोट्या गावातील युवकाला जगभरातील ज्ञानसंपदा काही क्षणांत उपलब्ध होऊ शकते. ऑनलाइन शिक्षण, डिजिटल सेवा, स्वतंत्र व्यवसाय, मुक्त व्यावसायिक काम, सर्जनशील उद्योग आणि नवउद्योजकता यामुळे तरुणांसाठी नवीन क्षेत्रे खुली झाली आहेत. परंतु डिजिटल साधनांचा वापर विवेकपूर्ण पद्धतीने करणेही तितकेच आवश्यक आहे. समाजमाध्यमांवरील चुकीची माहिती, अफवा, दिशाभूल करणारे संदेश, ऑनलाइन फसवणूक, अतिरेकी वापर आणि आभासी जगाचे वाढते आकर्षण यामुळे युवकांच्या विचारक्षमतेवर आणि सामाजिक संबंधांवर परिणाम होऊ शकतो. म्हणून डिजिटल साक्षरतेबरोबरच डिजिटल जबाबदारीची जाणीव निर्माण करणे आवश्यक आहे. तंत्रज्ञान हे साधन आहे; ते जीवनाचा पर्याय नाही, हे युवकांनी लक्षात ठेवले पाहिजे.

युवकांच्या सर्वांगीण विकासामध्ये मानसिक स्वास्थ्य आणि भावनिक सक्षमता यांनाही महत्त्वाचे स्थान आहे. स्पर्धेचे वाढते स्वरूप, शैक्षणिक अपेक्षा, रोजगाराची अनिश्चितता, आर्थिक दबाव, सामाजिक तुलना आणि समाजमाध्यमांमधून निर्माण होणारी कृत्रिम यशाची प्रतिमा यामुळे अनेक तरुणांवर मानसिक दबाव वाढत आहे. अपयशाला सामोरे जाण्याची क्षमता, स्वतःच्या भावनांची जाणीव, संवाद साधण्याची सवय आणि आवश्यकतेनुसार योग्य मदत घेण्याची सकारात्मक वृत्ती युवकांमध्ये विकसित करणे गरजेचे आहे. कुटुंब, शैक्षणिक संस्था आणि समाज यांनी युवकांच्या अडचणींकडे केवळ शिस्तीच्या किंवा यश-अयशाच्या चौकटीत न पाहता संवेदनशीलतेने पाहिले पाहिजे. मानसिकदृष्ट्या सक्षम युवकच आव्हानांचा सामना करून समाजाच्या विकासात प्रभावी योगदान देऊ शकतो.

युवक आणि सामाजिक परिवर्तन यांचे नाते अतूट आहे. इतिहासात अनेक सामाजिक परिवर्तनाच्या चळवळींमध्ये तरुणांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. स्वातंत्र्यलढ्यातील अनेक तरुण क्रांतिकारक, समाजसुधारक आणि विचारवंत यांनी देशासाठी मोठे योगदान दिले. महात्मा गांधी, स्वामी विवेकानंद, भगतसिंग, चंद्रशेखर आझाद, नेताजी सुभाषचंद्र बोस आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कायार्चा अभ्यास केला असता तरुणाईच्या ऊर्जा आणि विचारशक्तीचे महत्त्व स्पष्ट होते. आजच्या काळातील युवकांनी इतिहासातील या प्रेरणांचा अर्थ केवळ गौरवकथांमध्ये शोधू नये, तर सामाजिक जबाबदारी, समानता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या मूल्यांना आपल्या आचरणात स्थान द्यावे.

लोकशाहीच्या बळकटीकरणामध्ये युवकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. लोकशाही केवळ मतदान करण्यापुरती मर्यादित नसून प्रश्न विचारणे, सार्वजनिक धोरण समजून घेणे, सामाजिक समस्यांवर चर्चा करणे, कायद्याचा आदर करणे आणि सार्वजनिक हितासाठी सक्रिय सहभाग घेणे हीदेखील लोकशाहीचीच प्रक्रिया आहे. युवकांनी राजकीय आणि सामाजिक घडामोडींकडे चिकित्सक दृष्टीने पाहिले पाहिजे. जात, धर्म, भाषा, प्रदेश किंवा अफवांच्या आधारावर मतनिर्मिती करण्याऐवजी संविधानिक मूल्ये, विवेक, तथ्य आणि सार्वजनिक हित यांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. तरुण पिढीने लोकशाहीतील आपली भूमिका समजून घेतली, तर समाजातील ध्रुवीकरण कमी करून संवाद आणि सहकार्याची संस्कृती विकसित होऊ शकते.

भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला स्वातंत्र्य, समानता, न्याय आणि बंधुतेची मूल्ये दिली आहेत. युवकांनी या संविधानिक मूल्यांना केवळ पाठ्यपुस्तकातील विषय न मानता जीवनमूल्य म्हणून स्वीकारले पाहिजे. स्त्री-पुरुष समानता, सामाजिक न्याय, जातीय भेदभावाचा विरोध, वंचित घटकांबद्दल संवेदनशीलता, विविधतेचा आदर आणि मानवी प्रतिष्ठेचे संरक्षण या मूल्यांमधूनच आधुनिक भारताची निर्मिती होणार आहे. युवकांच्या विचारविश्वात वैज्ञानिक दृष्टिकोन आणि संविधानिक नैतिकता रुजविणे ही कुटुंब, शिक्षणसंस्था आणि समाजाची सामूहिक जबाबदारी आहे.

युवकांच्या सहभागाशिवाय पर्यावरण संरक्षणाचे उद्दिष्टही पूर्ण होऊ शकत नाही. हवामान बदल, जलसंकट, प्रदूषण, जंगलतोड आणि जैवविविधतेचा ऱ्हास या समस्या भविष्यातील पिढ्यांवर सर्वाधिक परिणाम करणार आहेत. त्यामुळे युवकांनी पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारणे, जलसंधारण, वृक्षसंवर्धन, कचरा व्यवस्थापन, ऊर्जा बचत आणि शाश्वत विकासाच्या उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेणे आवश्यक आहे. पर्यावरण संरक्षण ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. तरुणाईने पर्यावरणाच्या प्रश्नांकडे केवळ आंदोलनाच्या दृष्टीने न पाहता दैनंदिन जीवनातील सवयी बदलण्याच्या दृष्टीने पाहिले पाहिजे.

ग्रामीण युवकांकडे विशेष लक्ष देणे ही आजची गरज आहे. ग्रामीण भागातील तरुणांमध्ये क्षमता, श्रमशीलता आणि नवकल्पनाशक्ती मोठ्या प्रमाणात आहे; मात्र त्यांना संधींची कमतरता भासते. आधुनिक शेती, कृषीप्रक्रिया, दुग्धव्यवसाय, पर्यटन, हस्तकला, ग्रामीण उद्योग, डिजिटल सेवा आणि स्थानिक संसाधनांवर आधारित व्यवसाय यांच्या माध्यमातून ग्रामीण युवकांसाठी रोजगारनिर्मिती करता येऊ शकते. गावातील युवकांना गावातच गुणवत्तापूर्ण शिक्षण, कौशल्य प्रशिक्षण आणि उद्योजकतेच्या संधी मिळाल्या, तर ग्रामीण स्थलांतराचा दबाव कमी होऊ शकतो. ग्रामीण युवक हा केवळ रोजगाराचा शोध घेणारा घटक न राहता आपल्या गावाच्या विकासाचा नेतृत्वकर्ता बनू शकतो.

युवतींच्या सक्षमीकरणाशिवाय युवाशक्तीचा पूर्ण उपयोग होऊ शकत नाही. शिक्षण, रोजगार, सुरक्षितता, आरोग्य, डिजिटल प्रवेश, आर्थिक स्वावलंबन आणि निर्णयप्रक्रियेत समान सहभाग या संधी युवतींना मिळणे आवश्यक आहे. समाजाच्या प्रगतीमध्ये महिलांचे योगदान वाढवायचे असेल, तर मुलींच्या शिक्षणाला आणि त्यांच्या स्वावलंबनाला सर्वोच्च प्राधान्य द्यावे लागेल. ग्रामीण आणि वंचित पार्श्वभूमीतील युवतींसाठी विशेष कौशल्यविकास आणि रोजगाराच्या संधी निर्माण करणे गरजेचे आहे. महिला सक्षम झाल्या की कुटुंब, समाज आणि अर्थव्यवस्था या तिन्ही स्तरांवर सकारात्मक परिवर्तन घडते.

आजच्या युवकांसाठी मूल्याधिष्ठित नेतृत्वाची गरज आहे. नेतृत्व म्हणजे केवळ पद, अधिकार किंवा प्रसिद्धी नव्हे. नेतृत्व म्हणजे जबाबदारी स्वीकारणे, इतरांना सोबत घेणे, अडचणींवर उपाय शोधणे आणि सार्वजनिक हिताला प्राधान्य देणे. युवकांनी समाजमाध्यमांवरील प्रसिद्धीपेक्षा प्रत्यक्ष सामाजिक कायार्ला महत्त्व दिले पाहिजे. रक्तदान, आपत्ती व्यवस्थापन, स्वच्छता, साक्षरता, पर्यावरण संरक्षण, ग्रामविकास, सामाजिक समता आणि नागरिक जनजागृती यांसारख्या उपक्रमांमध्ये तरुणांनी सहभाग घेतला तर समाजातील सकारात्मक शक्ती अधिक बळकट होईल.

युवकांनी स्वतःच्या अधिकारांबरोबरच कर्तव्यांचीही जाणीव ठेवणे आवश्यक आहे. देशाकडून संधी मिळाव्यात अशी अपेक्षा करताना देशासाठी आपले योगदान काय असू शकते, हा प्रश्नही प्रत्येक तरुणाने स्वतःला विचारला पाहिजे. प्रामाणिकपणे शिक्षण घेणे, कौशल्य आत्मसात करणे, कायद्याचा आदर करणे, सार्वजनिक संपत्तीचे संरक्षण करणे, पर्यावरणाची काळजी घेणे, सामाजिक सलोखा राखणे आणि गरजू व्यक्तींना मदत करणे ही राष्ट्रनिर्मितीचीच कामे आहेत. देशभक्ती केवळ घोषणांमध्ये नसून आपल्या दैनंदिन आचरणात दिसली पाहिजे.

आंतरराष्ट्रीय युवा दिनाच्या निमित्ताने शासन, शिक्षणसंस्था, उद्योग, स्वयंसेवी संस्था आणि समाज यांनी युवकांकडे अधिक विश्वासाने पाहण्याची गरज आहे. युवकांना केवळ समस्या म्हणून पाहण्याऐवजी ते समस्यांचे समाधान देऊ शकतात, असा दृष्टिकोन विकसित करावा लागेल. त्यांना निर्णयप्रक्रियेत स्थान, नवकल्पनांना प्रोत्साहन, संशोधनासाठी संधी, कौशल्यविकासासाठी साधने आणि उद्योजकतेसाठी आवश्यक आधार दिला पाहिजे. शहरी आणि ग्रामीण, श्रीमंत आणि गरीब, डिजिटल साधनांनी सक्षम आणि डिजिटल सुविधांपासून वंचित अशा युवकांमधील दरी कमी करण्यासाठीही ठोस प्रयत्न आवश्यक आहेत.

आज भारतासमोर विकसित आणि समताधिष्ठित राष्ट्र घडविण्याचे मोठे स्वप्न आहे. हे स्वप्न केवळ शासनाच्या योजनांनी पूर्ण होणार नाही. त्यासाठी जागरूक, कुशल, सर्जनशील आणि जबाबदार नागरिकांची आवश्यकता आहे. या परिवर्तनाच्या केंद्रस्थानी युवक असतील. भारताची युवा शक्ती जर ज्ञान, कौशल्य, विज्ञान, तंत्रज्ञान, सामाजिक बांधिलकी आणि संविधानिक मूल्यांशी जोडली गेली, तर देशाच्या विकासाला अभूतपूर्व गती मिळू शकते. मात्र त्यासाठी युवकांना संधी देण्याबरोबरच त्यांच्यावर विश्वास ठेवण्याचीही गरज आहे.

आंतरराष्ट्रीय युवा दिन हा त्यामुळे केवळ उत्सवाचा दिवस नसून आत्मपरीक्षणाचा दिवस आहे. आपण आपल्या युवकांना कोणत्या संधी देत आहोत, त्यांच्या प्रश्नांकडे किती गांभीर्याने पाहत आहोत आणि त्यांच्या स्वप्नांना किती व्यापक आकाश देत आहोत, याचा विचार करण्याची ही वेळ आहे. युवक ही राष्ट्राची केवळ भविष्यातील आशा नाही; ते वर्तमानातील परिवर्तनाचे सक्रिय शिल्पकार आहेत. त्यांच्या हातात ज्ञानाची शक्ती, विचारांची प्रगल्भता आणि तंत्रज्ञानाची साधने आहेत. या शक्तीला योग्य दिशा मिळाली, तर सामाजिक विषमता कमी करता येईल, आर्थिक विकासाला चालना देता येईल आणि लोकशाही अधिक सक्षम करता येईल.

म्हणूनच आजच्या युवा पिढीसमोर एकच संदेश असायला हवा तो म्हणजे स्वप्ने मोठी पाहा, परंतु त्यासाठी परिश्रम करण्याची तयारी ठेवा; तंत्रज्ञानाचा स्वीकार करा, परंतु विवेक सोडू नका; यशाचा पाठपुरावा करा, परंतु मूल्यांचा त्याग करू नका; स्वतःच्या प्रगतीचा विचार करा, परंतु समाजाची जबाबदारी विसरू नका. राष्ट्रनिर्मिती ही केवळ नेत्यांची किंवा शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक पिढीची सामूहिक जबाबदारी आहे. त्या जबाबदारीचे सर्वाधिक सामर्थ्यवान वाहक म्हणजे युवक. म्हणूनच सक्षम युवक, समताधिष्ठित समाज आणि विकसित भारत ही तीन उद्दिष्टे परस्परांपासून वेगळी नसून एकमेकांशी घट्ट जोडलेली आहेत. युवाशक्तीला योग्य दिशा, समान संधी आणि मूल्याधिष्ठित नेतृत्व मिळाले, तर भारताच्या उज्ज्वल भविष्याचा मार्ग निश्चितच अधिक भक्कम होईल. आंतरराष्ट्रीय युवा दिनाच्या निमित्ताने हीच युवाशक्ती राष्ट्राच्या प्रगतीची नवी ऊर्जा ठरावी, हीच अपेक्षा.



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
bagate.rajendra5@gmail.com

पान १ वरून

## TET पेपरफुटी ...

करण्यात आली. प्रकरणाचा तपास भिवंडी पोलिसांचे विशेष पोलीस पथक करत आहे. यात्प्रकरणातील मुख्य सूत्रधार विजेंद्र गुप्ता याला अगोदरच अटक करण्यात आली होती. सुरुवातीला दिल्ली, आग्रा आणि बिहारमधून आरोपींना अटक करण्यात आली होती. तर प्रश्नपत्रिका फुटीचे राज्यातील धागेदोरे समोर आले होते. तपासादरम्यान प्रकाश पवार याचे नाव समोर आल्यानंतर कारवाई करण्यात आली. त्याच्या संस्थेतून महत्त्वाची कागदपत्रे आणि पुरावे शोधण्यात येत आहे. इतर व्यक्तींचा या परीक्षेशी काय संबंध होता याचा तपास करण्यात येत होता. भिवंडी पोलिसांनी टीईटी प्रश्नपत्रिका फुटीप्रकरणात आतापर्यंत 16 जणांना अटक केली आहे.

पोलिसांनी अगोदर उत्तर भारतात कारवाई केली. तपासाची व्याप्ती वाढल्यावर महाराष्ट्रातील काही जणांवर संशयाची सुई फिरली. पोलिसांनी कडी जुळवली. त्यात प्रकाश पवार याचे नाव समोर आले. त्याला पोलिसांनी ताब्यात घेतले. त्याची चौकशी केली. तेव्हा त्यांच्या हाती सज्जड पुरावे लागले आणि त्याला अटक करण्यात आली. यापूर्वी ज्या आरोपींना अटक करण्यात आली आहे. त्यातील काही विद्यार्थ्यांना पवार याने काही दस्तावेज पुरवल्याचे समोर आले आहे. आरोपीला आजच न्यायालयात हजर करण्यात येण्याची शक्यता आहे.

## पंढरपूर कॉरिडॉरला भाजप नेते सुब्रमण्यम...

कॉरिडॉर संदर्भात मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासमवेत समोरासमोर चर्चा करू, कॉरिडॉर नक्की कसा असतो हे आपण फडणवीसांना सांगू. आम्ही कॉरिडॉर विरोधी कोर्टात केस केली तर तुमचे काय हाल होतील? मी हात जोडून नमस्कार करणारा नाही. अशा शब्दात सुब्रमण्यम स्वामी यांनी पंढरपूर कॉरिडॉर संदर्भात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सुनावले. सुब्रमण्यम स्वामींनी एका व्हिडिओच्या माध्यमातून आपली प्रतिक्रिया दिली आहे. त्यामुळे सध्या सोशल मीडियावर हा व्हिडीओ सर्वांच्या चर्चेचा विषय बनला आहे.

विठ्ठल मंदिराचा सर्वांगीण विकासाचे ध्येय बाळगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पंढरपूर कॉरिडोअरला मंत्रिमंडळात मंजुरी दिलेली आहे. मात्र, काही स्थानिक व्यापाऱ्यांचा, नागरिकांचा या कॉरिडॉरला विरोध आहे. परंतु, ज्यांचा विरोध आहे, त्यांना विश्वासात घेऊनच त्यांचे कुठलेही नुकसान होणार नाही याचे आश्वासन देत कॉरिडॉर मंजूर करण्यात आला आहे. पंढरपूरला पुढील 50 वर्षात येणाऱ्या भाविकांची संख्या लक्षात घेऊन पंढरपूरसाठी मंदिर परिसरात कॉरिडॉर आणि शहरात विकास आराखडा तयार करण्यात आलेला आहे. जवळपास 4000 कोटींचा हा आराखडा असून याला आता मुख्यमंत्री यांच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळाच्या शिखर समितीने मंजुरी दिल्याने पंढरपुरात लवकरच या कामाला सुरुवात होणार आहे.

# भव्य रक्तदान शिबिर उत्साहात संपन्न; 31 रक्तदात्यांचे रक्तदान

**मोहोळ (कटूसत्य वृत्त) :-** श्रीहरी सार्वजनिक वाचनालय, वडाचीवाडी ता. मोहोळ यांच्या वतीने सामाजिक न्याय हक्कासाठी या संकल्पनेतून लोकनेते बाबुराव आण्णा पाटील व कै. हरिदास सुरवसे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेले भव्य रक्तदान शिबिर उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. या शिबिरात ३१ रक्तदात्यांनी स्वयंस्फूर्तीने रक्तदान करून समाजाप्रती आपली जबाबदारी पार पाडली.

शिबिराचे उद्घाटन अक्षय ब्लड बँकेचे उदय पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी त्यांनी रक्तदानाचे महत्त्व विशद करताना, "रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान असून एका रक्तदात्यामुळे अनेक रुग्णांना जीवनदान मिळू शकते. प्रत्येक निरोगी व्यक्तीने नियमित रक्तदानाचा संकल्प करावा," असे आवाहन केले.

श्रीहरी सार्वजनिक वाचनालय, वडाचीवाडी (ता. मोहोळ, जि. सोलापूर) येथे आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराला परिसरातील युवक, नागरिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. रक्तदात्यांचा आयोजकांच्या वतीने सन्मान करून त्यांचे आभार मानण्यात आले.

या रक्तदान शिबिरात गणेश विश्वनाथ म्हमाणे, लक्ष्मण लिंबा पाटेकर, सिध्देश्वर सुभाष सुरवसे, योगेश दशरथ चौधरी, अशोक पांडूरंग बचुटे, उमेश रामलिंग नाईकवाडी, प्रविण दत्तात्रय बचुटे, विजय भगवान सरवदे, बाळासाहेब ज्ञानोबा पासले, बाळासाहेब महादेव नाईकवाडी,

















विशाल माणिक थिटे, शिवाजी भागवत सरवळे, आकाश दत्तात्रय बचुटे, बालाजी रामचंद्र कदम, अशोक चंद्रकांत लोंढे, पांडूरंग हरिदास सुरवसे, शशीपाल मधुकर म्हमाणे, नेताजी राजाराम सुरवसे, सौ. सुनिता बाळू जाधव, संजय शंकर निचळ व रविंद्र सुर्यभान नागटिळक यासह अनेक रक्तदात्यांनी रक्तदान केले.

या रक्तदान शिबिराचे आयोजन सुयश दूध संकलन केंद्र तसेच नेताजी राजाराम सुरवसे यांच्या पुढाकारातून करण्यात आले. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी पांडुरंग सुरवसे, सुहास म्हमाणे यांच्यासह सर्व सहकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

रक्तदानाच्या माध्यमातून समाजात मानवतेचा संदेश देत गरजू रुग्णांसाठी रक्ताचा साठा उपलब्ध करून देण्याचा या उपक्रमाचा उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले. शिबिराच्या यशस्वी आयोजनाबद्दल उपस्थित मान्यवरांनी आयोजकांचे अभिनंदन केले.

## वात्रटिका

### बनावट आणि भेसळ

कुठे कुठे लक्ष ठेवणार
चहुकडे सारेच बनावट...
फोडणी बसली आधीच
आणि कळले ते तेलकट...
अज्ञानात सुख होते,आता
उगाच धाकधूक वाढली...
जीवाशी खेळ मांडला आणि
पैशासाठी त्यांनी लाज सोडली...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# नेताजी प्रशालेच्यावतीने हर घर तिरंगा रॅली



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** निलम नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस प्रशालेच्यावतीने हर घर तिरंगा रॅली करण्यात आली. प्रशालेतील स्काऊट गाईड पथकातील ३४० विद्यार्थ्यांनी नीलम नगर, म्हेत्रे नगर, माळी वस्ती, जमादार वस्ती, अंबिका नगर आणि इंगळे वस्ती या परिसरातून रॅली काढले. रॅलीत विद्यार्थ्यांनी भारत माता की जय, वंदे मातरम्, तिरंगा आमची शान भारत देश महान, घराघरात तिरंगा मनामनात देशभक्ती, हुतात्म्यांच्या बलिदानाला—शतशः नमन, तिरंग्याचा मान राखू—भारताचा गौरव वाढवू आदी विविध प्रकारचे देशभक्तीपर घोषणा दिल्या. घोषणांनी परिसरात राष्ट्रभक्तीचे वातावरण निर्माण करण्यात आले.

यावेळी प्रशालेचे सांस्कृतिक प्रमुख शिवानंद पुजारी यांनी तिरंगा ध्वजाची रचना, महत्त्व व आचारसंहितेचे पालन याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. रॅलीत प्राचार्य रविशंकर कुंभार व पर्यवेक्षक गौरीशंकर आळंगे, स्काऊट प्रमुख अशोक पाटील, रेवणसिद्ध दसले, विश्वाराध्य मठपती, बसवराज तेग्गेळी, गणपती पाटील, शीतल पाटील, गाईडचे प्रमुख विजयालक्ष्मी माळवदकर, जयश्री बिराजदार, मीनाक्षी वांगीकर आदींनी सहभाग घेतले.

**देशभक्तीची भावना**

'हर घर तिरंगा' अभियानाचे मुख्य उद्दिष्ट नागरिकांच्या मनात देशभक्तीची भावना जागृत करणे, राष्ट्रध्वजाबद्दलचा आदर वाढवणे आणि राष्ट्रध्वजाशी असलेले आपले नाते अधिक वैयक्तिक व जिव्हाळ्याचे बनवणे आदी उद्दिष्टे असल्याचे मुख्याध्यापक रविशंकर कुंभार यांनी सांगितले.

# करमाळ्यात माळढोक अभयारण्यात घोरपडीची शिकार; दोघांवर वनविभागाची कारवाई



**करमाळा (कटूसत्य वृत्त):-** माळढोक पक्षी अभयारण्याच्या हूलगेवाडी परिसरातील राखीव वनक्षेत्रात घोरपडीची शिकार केल्याप्रकरणी वनविभागाने दोघांवर कारवाई केली आहे. वनविभागाच्या गस्ती दरम्यान दोघे जण शिकार करताना आढळून आले असून त्यांच्या ताब्यात जखमी अवस्थेतील जिवंत घोरपड तसेच तीन जाळी आढळून आली. या प्रकरणी दोन्ही आरोपींना न्यायालयासमोर हजर केले असता, त्यांना दोन दिवसांची वन कोठडी मंजूर करण्यात आली आहे.

माळढोक पक्षी अभयारण्यांतर्गत मौजे हूलगेवाडी, गट क्रमांक ३२, ता. करमाळा, जि. सोलापूर येथे ९ ऑगस्ट रोजी वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी नियमित गस्त घालत होते. यावेळी दुपारच्या सुमारास संबंधित परिसरात घोरपडीची शिकार केल्याचे वनअधिकाऱ्यांच्या निदर्शनास आले.

घटनास्थळी पाहणी केली असता अक्षय शिवदास गोरे (वय अंदाजे ३०, रा. वंजारवाडी, ता. करमाळा) आणि सुरेश रामदास गायकवाड (वय अंदाजे ४०, रा. वंजारवाडी, ता. करमाळा) हे दोघे अभयारण्याच्या राखीव वनक्षेत्रात शिकार करताना आढळून आले. त्यांच्या ताब्यात जिवंत मात्र जखमी अवस्थेतील घोरपड आढळून आली. तसेच तीन जाळीही आढळून आल्याने वनविभागाने घोरपड व जाळी जप्त केली.

या प्रकरणी दोन्ही आरोपींना १० ऑगस्ट रोजी प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, करमाळा यांच्या न्यायालयासमोर हजर करण्यात आले. न्यायालयाने दोन्ही आरोपींना दोन दिवसांची वन कोठडी मंजूर केली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास माळढोक पक्षी अभयारण्य, करमाळा येथील वनपरिक्षेत्र अधिकारी करीत आहेत.

ही कारवाई उपवनसंरक्षक, वन्यजीव विभाग पुणे केशव वाबळे आणि सहाय्यक वनसंरक्षक, माळढोक पक्षी अभयारण्य प्रदीप कदम यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. वनपरिक्षेत्र अधिकारी रोहिणी साळुंखे, वनपाल अनंता कारंडे, पद्मिनी कांबळे, वनरक्षक माधुरी जाधव, प्रदीप शिंदे, बबन दहातोंडे, नवनाथ दळवी तसेच सर्व वनमजूर व रेंज स्टाफ यांनी या कारवाईत सहभाग घेतला.

वन्यजीवांचे संरक्षण, जैवविविधतेचे संवर्धन आणि अभयारण्यांचे रक्षण ही प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. वन्यजीवांशी संबंधित अशा प्रकारच्या गुन्ह्यांविरुद्ध भविष्यातही कठोर कारवाई करण्यात येईल, असे वनविभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

# महिलेच्या अग्निसंस्काराच्या ठिकाणी उकरून कवटीसह कमरेवरील भाग गायब

## दागिन्यांच्या संशयावरून मृतदेहाची विटंबना? परिसरात प्रचंड खळबळ; पोलिस तपासाची मागणी



**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):** टेंभुर्णी परिसरात अत्यंत धक्कादायक आणि संतापजनक घटना उघडकीस आली आहे. मृत्यू झालेल्या रूपाली जगताप यांच्या अंत्यसंस्कारानंतर तिसऱ्या दिवशी सकाळी सावडण्याच्या विधीसाठी नातेवाईक शेतात गेले असता, अग्निसंस्कार केलेल्या ठिकाणी उकरून छेडछाड केल्याचे आढळून आले.

नातेवाईकांच्या म्हणण्यानुसार, कमरेपासून वरचा संपूर्ण भाग, कवटीसह, तेथून गायब होता. संबंधित ठिकाण साफ करण्यात आल्याचेही दिसून आले. या प्रकारामुळे कुटुंबीयांना जबर धक्का बसला असून परिसरात भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

मृत महिलेच्या अंगावर अंत्यसंस्कारावेळी सोन्याचे दागिने असल्याचे नातेवाईकांनी सांगितले आहे. त्यामध्ये लहान सोन्याच्या पोतीमध्ये ओवलेले सुमारे ४० मणी, मोठे ६ मणी, दोन डोरल्या (अर्धा ग्रॅमच्या), डोरल्याजवळील ६ मणी, जोडवी तसेच सोन्याची नथ यांचा समावेश असल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे दागिन्यांच्या उद्देशाने हा प्रकार घडला असावा, असा संशय नातेवाईकांनी व्यक्त केला आहे. मात्र, याबाबत अधिकृत तपासातूनच वस्तुस्थिती स्पष्ट होणार आहे.

घटनास्थळी एका महिलेची भिजवलेली ओढणी तसेच गायछाप तंबाखूची रिकामी पुडी आढळून आल्याचा दावाही करण्यात आला आहे. या वस्तूंच्या आधारे तपास करून संबंधितांचा शोध घ्यावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. तसेच अशा स्वरूपाचे प्रकार गेल्या दोन वर्षांपासून परिसरात घडत असल्याची चर्चा स्थानिकांमध्ये आहे.

या अभूतपूर्व घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून, अशा अमानुष प्रकारांवर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून सर्व बाबींची सखोल चौकशी करावी, तसेच दोषींना तातडीने अटक करावी, अशी मागणी नातेवाईक आणि ग्रामस्थांनी केली आहे.

# सद्भावना तिरंगा केंद्रावर यंदा प्रथमच भारतमातेची आकर्षक मूर्ती

## १३ ते १५ ऑगस्टदरम्यान तिरंगा वस्तू, मिठाई उपलब्ध



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर सद्भावना वंदे मातरम मंडळाच्या वतीने यंदाही 'एकता उत्सव' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. सद्भावना तिरंगा केंद्र (बंगला) यंदा प्रथमच ३.५ ते ४ फूट उंचीची फायबरची आकर्षक भारतमाता मूर्ती उपलब्ध करून देण्यात आली आहे. १३ ते १५ ऑगस्टदरम्यान तिरंगा वस्तू , मिठाई उपलब्ध राहणार आहेत, अशी माहिती सद्भावना सेवा दलाचे दिव्यकांत गांधी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

३४व्या वर्षात पदार्पण केलेला आणि ६४ व्यांदा आयोजित करण्यात येणाऱ्या या उत्सवाची मोठी तयारी करण्यात आली आहे. या केंद्रावर ६ बाय ९ फुटांचा व ४ बाय ६ फुटांचा राष्ट्रध्वज, तिरंगा फ्लॉक-जॅकेटसह विविध देशप्रेमाच्या वस्तू तिरंगा केंद्रावर उपलब्ध असतील. १३ ते १५ ऑगस्टदरम्यान सद्भावना तिरंगा केंद्रावरून तिरंगा वस्तू आणि मिठाईचे वितरण करण्यात येणार आहे. यंदा प्रथमच बालूशाही उपलब्ध करून देण्यात आली आहे. याशिवाय ड्रायफ्रूट तिरंगा मिठाई, केशर लाडू, ड्रायफ्रूट मसाला चिवडा, मसाला शेव-दाळ आदी पदार्थ उपलब्ध असतील.

तिरंगा केंद्रावर राष्ट्रध्वजाबरोबरच देशप्रेमाचे प्रतीक असलेल्या डायमंड तिरंगा अंगठ्या, बॅचेस, कार्यालय किंवा वाहनात लावण्यासाठी आकर्षक क्रॉस-मेटल तिरंगा, क्रॉस अशोकस्तंभ, घड्याळ, भारताचा नकाशा, हातातील कापडी तिरंगा, बँड, मफलर, की-चेन, पताका, तिरंगा स्टिकर, तोरण, कॅप, तिरंगा टी-शर्ट, तिरंगा ओढणी आदी विविध वस्तू उपलब्ध आहेत.

१७ ऑगस्ट रोजी आश्रमशाळा, कॉलनीमध्ये काम करणारे कर्मचारी, वॉचमन, भाजी मार्केटमधील कर्मचारी तसेच सद्भावना कार्यात मदत करणाऱ्यांना देशप्रेमाचे लाडू आणि तिरंगा बर्फीचे वितरण करण्यात येणार आहे. १८ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्य दिन उत्सवाच्या आयोजनात हातभार लावणाऱ्या रिक्षाचालकांना लाडू व बर्फीचे वाटप केले जाणार आहे.

या पत्रकार परिषदेस ध्रुवेश गांधी, रोशन शेख, सोना गांधी, श्रुती गांधी, स्नेहा गांधी, रूपा पारेख, नारायण छाब्रिया, मयुर सोलनकर, प्रकाश लोढा, गणेश खेडकर आणि जयदेव बाहेरमठ उपस्थित होते.

**१५ ऑगस्टला भारतमाता पूजन**

स्वातंत्र्य दिन उत्सवांतर्गत १५ ऑगस्ट रोजी सकाळी ११.३० वाजता मान्यवरांच्या हस्ते भारतमाता पूजन करण्यात येणार आहे. त्यानंतर राष्ट्रीय उत्सवात सहकार्य करणाऱ्या विविध घटकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात येणार आहे.

# श्री चौडेश्वरी तोगटवीर क्षत्रिय पतपेढीची मिश्र व्यवसाय 600 कोटी पर्यंत नेणार - चेअरमन लक्ष्मीकांत उदगिरी



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सहकार क्षेत्रात अत्यंत नावाजलेली पतपेढी म्हणजे श्री चौडेश्वरी तोगटवीर क्षत्रिय नागरी सहकारी पतपेढी होय. त्याची व्यवसाय आता 600 कोटी पर्यंत नेणार असल्याचे संकल्प संचालक मंडळांनी केले असल्याचे मत चेअरमन लक्ष्मीकांत रामचंद्र उदगिरी यांनी व्यक्त केले.

कन्ना चौक येथील तोगटवीर भवन मध्ये संपन्न झालेल्या 39 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत वरील संकल्प करण्यात आला. सभेच्या सुरुवातीला चेअरमन लक्ष्मीकांत रामचंद्र उदगीरी यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून उद्घाटन करण्यात आले यावेळी व्हाईस चेअरमन विलास बडगंची यांच्यासह समाजाचे अध्यक्ष व सल्लागार नागनाथ कोंतम यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना चेअरमन लक्ष्मीकांत रामचंद्र उदगिरी म्हणाले की पतपेढीची मिश्र व्यवसाय आता 575 कोटी झाले असून लवकरच 600 कोटींचा व्यवसाय आम्ही पूर्ण करण्याचा विश्वासाचा संकल्प सर्व सक्षम संचालक मंडळाने व सेवकांनी घेतला आहे यामध्ये प्रामुख्याने ठेवीदार, गुंतवणूकदार आणि तसेच कर्जदार यांचा समावेश आहे. आणि या आर्थिक वर्षात 10 महिन्यात 100 कोटी मिश्र व्यवसाय पूर्ण झालेला असून तसेच एकही सोने जिन्नस कलम लिलाव झालेला नाही.

आपल्या पतपेढीचा व्यवसाय पाहता संरक्षित कर्जच जास्त प्रमाणात दिली गेली आहेत त्यामुळे शंभर टक्के रिकवरी होण्याकडे पतसंस्थेचा कल असतो. सभासद गुंतवणूक आणि कर्ज घेणारे ग्राहक, हे यामुळेच संस्थेला मोठ्या प्रमाणात नफा झाले असल्याचे त्यांनी सांगितले.

पुढचे आर्थिक वर्ष हे 40वे वर्षे असून यावर्षी संस्थापक संचालकांचा मानपत्र देऊन गौरव करण्यात यावे असे यावेळी ठरले. दरवर्षीप्रमाणे यंदाच्या वर्षी देखील सभासदांच्या गुणवंत पाल्यांचा सत्कार करण्यात आला.

या 39व्या सर्वसाधारण सभेस आलेल्या सर्वसामान्य सभासदांचे प्रश्न देखील ऐकून घेण्यात आले आणि त्यांच्या शंकांचे निरसन देखील करण्यात आले. या वार्षिक सर्वसाधारण सभेस जेष्ठ संचालक अरुण चिंता, विठ्ठल बडगंची, अरविंद पुडूर, नरेंद्र बत्तुल, मोहन खंडे, विष्णू म्याकल, शंकर कोंतम, अजय रंगम, चंद्रकांत रंगम, सौ. उमा पुरुड, अंबिका उदगिरी, विजयकुमार शिंपी, रूपसिंग राठोड, भगवंत फलमारे, अंबादास कंदीकोंडा, व्यवस्थापक श्रीकृष्ण डक्का व उपव्यवस्थापक अनिल चिंता आदींसह सभासद व सेवक वर्ग मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## चौकशीची जाहीर नोटीस

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय सोलापूर विभाग सोलापूर**
**ब.अ.नं.१०४२/२०२३ कि.अ.क्र.१०४३/२०२३**

संस्थेचे नांव :- कपिल शिक्षण प्रसारक मंडळ व समाजसेवा बक्षीहिप्परगे ता दक्षिण सोलापूर.
न्यास नों.क्र. :- एफ -४२१५ /सोलापूर
अर्जदार -श्री विश्रांत नारायण गायकवाड
विरूध्द :- कोणी नाही-गैरअर्जदार

सदरील अर्ज अर्जदार यांनी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ व सोसायटीज रजिस्ट्रेशन अ‍ॅक्ट १८६० चे कलम १२-अ अन्वये संस्थेच्या नांवात पत्यात व घटना नियमावलीत बदल करून मिळणेसाठी अर्ज मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त साहेब यांच्या कार्यालयात दाखल केलेले आहे. या नोटीसीध्दारे कळविण्यात येते की. या न्यासाचे आपले काही संबंध असल्यास अथवा काही हरकत /तक्रार नोंद करायची असल्यास आपण स्वत: किंवा वकिलामार्फत ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत आपली हरकत लेखी स्वरूपात दाखल करावी ३० दिवसानंतर आपले कुठलेही प्रकारच्या हरकतीचा व कुठल्याही बाबींचा विचार केला जाणार नाही. आणि एकतर्फा हुकुम करून सदरचे प्रकरण निकाली काढण्यात येईल. याची कृपया नोंद घ्यावी . ही नोटीस माझ्या सहिनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांचे शिक्यानिशी दि. १०/०८/२०२६ दिली आहे.

शिक्का

**अधिक्षक**
**सार्वजनीक न्यास नोंदणी कार्यालय**
**सोलापूर विभाग सोलापूर**

## चौकशीची जाहीर नोटीस

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय सोलापूर विभाग सोलापूर**
**ब.अ.नं.२०१५/२०२३ कि. अ.क्र.२०१६/२०२३**

संस्थेचे नांव:- आर. जी. मागसवर्गीय बहुउद्देशिय सेवाभावी संस्था सोलापूर.
न्यास नों.क्र. :- एफ -२२८०६/सोलापूर
अर्जदार -श्री मनोज पुंडलिक ढावरे
विरूध्द :- कोणी नाही-गैरअर्जदार

सदरील अर्ज अर्जदार यांनी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ व सोसायटीज रजिस्ट्रेशन अ‍ॅक्ट १८६० चे कलम १२-अ अन्वये संस्थेच्या नांवात पत्यात व घटना नियमावलीत बदल करून मिळणेसाठी अर्ज मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त साहेब यांच्या कार्यालयात दाखल केलेले आहे. या नोटीसीध्दारे कळविण्यात येते की. या न्यासाचे आपले काही संबंध असल्यास अथवा काही हरकत /तक्रार नोंद करायची असल्यास आपण स्वत: किंवा वकिलामार्फत ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत आपली हरकत लेखी स्वरूपात दाखल करावी ३० दिवसानंतर आपले कुठलेही प्रकारच्या हरकतीचा व कुठल्याही बाबींचा विचार केला जाणार नाही. आणि एकतर्फा हुकुम करून सदरचे प्रकरण निकाली काढण्यात येईल. याची कृपया नोंद घ्यावी . ही नोटीस माझ्या सहिनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांचे शिक्यानिशी दि. /०८/२०२६ दिली आहे.

शिक्का

**अधिक्षक**
**सार्वजनीक न्यास नोंदणी कार्यालय**
**सोलापूर विभाग सोलापूर**

# महापालिका कामगारांची पिळवणूक थांबवा

## सभापती श्रद्धा पवार यांची महापौरांकडे तक्रार



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिकेतील विविध विभागांमध्ये कार्यरत कामगारांना कार्यालयीन वेळेपेक्षा जास्त वेळ काम करण्यास भाग पाडले जात असून, अतिरिक्त कामाचा मोबदला दिला जात नसल्याचा गंभीर आरोप भाजपच्या नगरसेविका तथा कामगार व समाज कल्याण सभापती सौ. श्रद्धा किरण पवार यांनी केला आहे. कामाच्या ठिकाणी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून कामगारांना अपमानास्पद वागणूक दिली जात असल्याचेही त्यांनी म्हटले असून, या प्रकरणी त्यांनी महापौरांकडे लेखी तक्रार केली आहे.

महापालिकेतील विविध खात्यांतर्गत मोठ्या प्रमाणावर कामगार कार्यरत आहेत. मात्र, या कामगारांना मानसिक व शारीरिक त्रासाला सामोरे जावे लागत असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. कामाच्या ठिकाणी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून कामगारांना हीन दर्जाची व अपमानास्पद वागणूक दिली जाते, असा आरोप नगरसेविका पवार यांनी केला आहे. या प्रकारामुळे कामगारांच्या मानसिक स्वास्थ्यावर तसेच आत्मसन्मानावर विपरीत परिणाम होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

तसेच, कार्यालयीन वेळ संपल्यानंतरही कामगारांना जबरदस्तीने थांबवून अतिरिक्त काम करून घेतले जाते. या अतिरिक्त कामाचा (ओव्हरटाईम) योग्य मोबदला अथवा भत्ता दिला जात नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्याचबरोबर नोकरीवरून काढण्याची तसेच दंडात्मक कारवाई करण्याची धमकी दिली जात असल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

हा प्रकार कामगार कायद्यांचे सरळ उल्लंघन करणारा असल्याचा दावा करत नगरसेविका पवार यांनी महापालिका प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेण्याची मागणी केली आहे. या कथित पिळवणुकीमुळे महापालिका कामगार मानसिक तणावाखाली असल्याचेही त्यांनी नमूद केले.

कामगारांना सुरक्षित आणि निर्भीडपणे काम करता यावे, यासाठी प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून संबंधित प्रकार थांबवावा, अशी मागणी सौ. श्रद्धा पवार यांनी महापौरांकडे केली आहे. त्यामुळे आता महापालिका प्रशासन या तक्रारीची दखल घेऊन कोणती कार्यवाही करते, याकडे कामगारांचे लक्ष लागले आहे.

याबाबत सभापती श्रद्धा पवार यांनी बोलताना सांगितले की महापालिकेतील कोणत्याही कामगारांना अन्याय अथवा पिळवणूक होत असल्याची कोणतीही तक्रार असल्यास महापालिकेतील माझ्या कार्यालयात संपर्क साधावा. त्यांना मदत करण्यासाठी मी तत्पर असेल असेही त्यांनी पुढे सांगितले.


# Classified - छोटी जाहीरात

## बोअरवेल

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)

## अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

## पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

## वर-वधू




**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड़व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र

**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.


## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) आमदार या सभागृहासाठी जनतेतून निवडून दिले जातात २) श्वसनेंद्रिय ३) बारीक खडी, चक उलट लिहा ४) राशीचक्रातील एक रास ५) लहान डोंगर ६) एक म्हण-** वसे ते स्वप्नी दिसे ७) एक अभिनेता-*** दामले ८) दारू (हिंदीत) ११) धरणग्रस्त आंदोलनाच्या नेत्या-** पाटकर १३) घर (हिंदीत) १४) स्त्रियांनी कपाळभर लावलेले कुंकू १५) उन्हाळ्यात पिले जाणारे एक दुग्धपेय १७) कोकणातील एक प्रख्यात तालुका १८) महानगरपालिकेवर वॉर्डमधून निवडून जाणारा लोकप्रतिनिधी २२) दहा गुणिले नऊ २४) नशीब (हिंदीत) २५) हात, हस्त, टॅक्स (मराठीत) २७) कष्टाची सवय असणारा २८) फटाक्यांची माळ २९) वाळवलेली खजूर ३१) एक रास ३३) खोडकर (हिंदीत) ३५) दैत्य, राक्षस ३६) याच्यापासून ताक बनवितात ३८) रावणाची बहीण ३९) प्रश्न (हिंदीत) ४०) वेग ४१) स्त्रिया केसात बांधतात ती फुलांची माळ ४२) पक्ष्याचे पंख (हिंदीत) ४३) लोभ, स्वार्थ ४४) बंदूक (इंग्रजीत) ४६) दहा (हिंदीत)

**आडवे शब्द :** १) शिवसंग्राम संघटनेचे संस्थापक
६) भारतातील एक राज्य
९) भीती, दरारा १०) स्पर्धेमध्ये विजेत्या संघास दिला जाणारा कप
१२) मंद प्रकाश (इंग्रजीत) १४) स्वार्थ, हेतू
१६) मनाची तृप्तावस्था, मुलाचे एक नाव
१९) लहान बाळाच्या डोळ्यात घालतात ते २०) कपाळ
२१) श्रीगणेशाचे एक नाव २३) तव उलट लिहा
२६) एक म्हण-हाजीर तो *** २७) खर्चात केलेली बचत
२९) एक म्हण-** तशी माती
३०) कोकण किंवा समुद्रालगतचे हवामान
३२) पतीचा भाऊ ३३) लग्नातील वधू मुलगी ३४) कसयुक्त, सत्व अर्क असलेली
३७) बेळगाव या राज्यात आहे ३८) धाडसी, पराक्रमी
३९) स्वाक्षरी ४०) बोलबाला, बोभाटा
४२) सूर्य उगवण्यापूर्वीचा उष:काल
४४) गणेशोत्सवात आपण याची प्रतिष्ठापना करतो ४५) गतीने, वेगात
४७) वर उलट लिहा ४८) पगार (हिंदीत)

## सुडोकु - 26

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 5 | 8 | | 7 | | | | 2 |
| | 4 | | | 6 | 2 | | 9 | 8 |
| 2 | 9 | 1 | | 3 | | 7 | | |
| | | 6 | 9 | | | 4 | | 7 |
| 3 | 2 | | 6 | | | | 1 | 5 |
| | 7 | | 2 | 5 | 4 | 6 | | 3 |
| | | | 8 | 9 | 1 | 2 | | 6 |
| | | | | 2 | | | 4 | |
| | | | | | | 8 | | 1 |

# आ. अभिजीत पाटील यांचा श्री विठ्ठल कारखान्यावर सत्कार, अभिष्टचिंतन सोहळा संपन्न

**पंढरपूर, (कटूसत्य वृत्त):–** श्री विठ्ठल सह. साखर कारखान्याचे चेअरमन, आमदार अभिजीत (आबा) पाटील यांचे ४३ व्या वाढदिवसानिमित्त सत्कार व अभिष्टचिंतन सोहळा कारखाना कार्यस्थळावरील श्री विठ्ठल प्रशाला येथे संपन्न झाला. त्यावेळी संचालक, कार्यकारी संचालक, अधिकारी, कर्मचारी, कंत्राटदार, श्री विठ्ठल सर्व सेवा संघ, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी श्री विठ्ठल प्रशाला व श्री विठ्ठल कृषि महाविद्यालय यांचे उपस्थितीत केक कापून वाढदिवस साजरा करणेत आला.



सत्काराला उत्तर देताना सत्कारमुर्ती श्री विठ्ठल कारखान्याचे चेअरमन, आमदार अभिजीत (आबा) पाटील म्हणाले की, आपण केलेला सत्कार मी नम्रपुर्वक स्विकारत असून सर्वसामान्य कुटुंबातील व्यक्ती आपले सर्वांच्या आशिवार्दाने या कारखान्याचा चेअरमन व आमदार झालेलो आहे. यावषीर्चा वाढदिवस अमेरिकेतील न्यूयॉर्क मधील सर्वात प्रतिष्ठीत समजल्या जाणाऱ्या टाईम्स स्क्वेअर अर या ठिकाणी करणेत आला, हा माझ्यासाठी अत्यंत महत्वाचा क्षण होता. सामाजिक बांधीलकी जोपासत प्रत्येक गांवामध्ये रक्तदान शिबीर, सर्वरोग निदान शिबीर, वृक्ष लागवड, शालेय साहित्य वाटप व महिला आरोग्य शिबीर आयोजित करणेत आलेमुळे लोकांना आरोग्याची सेवा उपलब्ध करुन दिली. आपलेकडे दुष्काळी परिस्थिती असतानासुध्दा उजनी धरण पुर्णपणे भरल्याने शेतकऱ्यांनी शेतीमध्ये जास्त लक्ष देवून उत्पन्नात वाढ करण्याचा प्रयत्न करावा. तसेच माझ्यावर जो विश्वास टाकलेला आहे. त्या विश्वासास तडा जाऊ देणार नाही व या कारखान्यास गतवैभव प्राप्त करुन देणेसाठी मी कटीबध्द आहे, अशी त्यांनी भावना व्यक्त केली.

कै.आमदार भारतनाना भालके यांनी २० वर्षापुर्वी कृषि महाविद्यालय स्थापन करणेचे पाहिलेले स्वप्न आज आपण पुर्ण करत असून श्री विठ्ठल कृषि महाविद्यालयाची सुरुवात करित आहोत. कारखाना कार्यस्थळावर इयत्ता पहिली ते पदव्युत्तर शिक्षणाची सोय करणेचा मानस असून सिनिअर कॉलेज, आय. टी. आय. कॉलेज स्थापन करणेचे प्रस्ताव सादर करणेत आलेले आहेत, सदर शैक्षणिक संस्थामधून भागातील सर्व शेतकऱ्यांची मुले शिक्षण घेतील.

अमेरिका अभ्यास दौऱ्यासाठी देशभरातून ३२ आमदारांची निवड करणेत आलेली असून महाराष्ट्रातून ११ आमदारांची निवड करणेत आलेली होती. या अभ्यास दौऱ्यामध्ये अमेरिकेतील शिक्षण पध्दती, आरोग्य सेवा, निवडणूक प्रक्रिया, शेती विषयक बाबींची माहिती सांगीतली, सदर अभ्यास दौऱ्या दरम्यान महाराष्ट्रातील येरमाळा येथील डॉ. बालाजी आगलावे यांचेशी संवाद होवून त्यांची अमेरिकेमध्ये १८०० एकर जमीन आहे. सदर जमीनमध्ये मोसंबी, संत्रे, ऊस, आंबा, सिताफळ या सारख्या पिकांवर संशोधन करुन त्यांनी पेटंट मिळवले आहे. तसेच त्यांची स्वतःची कंपनी असून त्यांचे बरोबर आपले कृषि महाविद्यालयाचे टेक्नॉलॉजी एक्सचेंज ॲग्रीमेंट केले जाणार आहे. सदर ॲग्रीमेंटमध्ये आपले कृषि महाविद्यालयातून पदवी पुर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना अमेरिकेमध्ये नोकरी देवून मास्टर करणेसाठी संपुर्ण खर्च करणेची तयारी त्यांनी दाखविलेली आहे.

विद्यार्थ्यांना आवाहन करताना म्हणाले की, विद्यार्थ्यांनी धाडस केल्याशिवाय मोठे स्वप्न पहाता येत नाहीत, त्यामुळे मोठे स्वप्न पाहावे ते स्वप्न पुर्ण करणेची जबाबदारी आमची आहे. जगात अशी कोणतीही गोष्ट नाही की ती पुर्ण होवू शकत नाही. त्यामुळे शिक्षक व पालकांनी मुलांना मोठे स्वप्न पाहणेसाठी प्रवृत्त करावे,

कारखाना व कृषि महाविद्यालय यांचे वतीने एकरी १०० टन उत्पादन घेणेसाठी शेतकऱ्यांसाठी प्रत्येक गांवामध्ये मार्गदर्शन शिबीर आयोजित करावीत.

ऊस लागवड करणेसाठी त्यांना प्रोत्साहित करावे. ऊस उत्पादन चांगल्या पध्दतीने घेवून यावर्षी साखरेचे दर वाढल्याने ऊसाला चांगला दर मिळणार आहे.

आपले कारखान्याचे विस्तारीकरण झाल्याने गळीत जास्त होणार आहे. श्री विठ्ठल कारखान्यावर विश्वास निर्माण झालेला असून आपणास जादा प्रमाणात ऊस गाळपास मिळेल, त्यामुळे या संस्थेच्या हितास बाधा येवू देणार नाही, सर्वांनी येणारा गळीत हंगाम यशस्वी होणेसाठी सहकार्य करावे.

स्वागत व प्रस्ताविकात बोलताना कारखान्याचे कार्यकारी संचालक डी. आर. गायकवाड म्हणाले की, कारखान्याचे चेअरमन, आमदार अभिजीत (आबा) पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त दि. १ ऑगस्ट ते ८ ऑगस्ट या कालावधीतील कारखाना व शाळा कॉलेज यांचे वतीने विविध कार्यक्रम घेण्यात आलेले असून या सर्व उपक्रमाचा एकत्रित आढावा म्हणजे सामाजिक, शैक्षणीक व सांस्कृतिक उपक्रमांची मालिका राबविणेत आली. त्यामध्ये विदयार्थ्यांना खाऊ, गणवेश व शालेय साहित्य वाटप, वृक्षारोपण व श्री नागन्नाथ मुकबधीर विद्यालय बाभुळगांव येथील विद्यार्थ्यांना स्नेह भोजन, रक्तदान, नेत्ररोग तपासणी,उपचार व मोफत चष्मे वाटप शिबीर, महिला आरोग्य शिबीर व राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले होते. आपल्या नेवृत्वाला आमचे सदैव सहकार्य, विश्वास आणि साथ राहील याची ग्वाही देवून वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. धनंजय आर्वे यांनी केले तर आभार नागटिळक यांनी मानले.

सदर कार्यक्रमास कारखान्याचे संचालक सर्वश्री दिनकर चव्हाण, सुरेश भुसे, बाळासहोब हाके, धनंजय काळे, साहेबराव नागणे, कालिदास साळुंखे, सचिन वाघाटे, जनक भोसले, प्रविण कोळेकर, दत्तात्रय नरसाळे, सिताराम गवळी, विठ्ठल रणदिवे, महेश खटके, विठ्ठल पाटील, दशरथ जाधव, अशोक तोंडले, धनाजी खरात, तानाजी बागल, उमेश मोरे, अंगद चिखलकर, अशोक घाडगे, गणेश ननवरे, कारखान्याचे सर्व अधिकारी, कर्मचारी वर्ग, श्री विठ्ठल प्रशाला व श्री विठ्ठल कृषि महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर स्टाफ, विद्यार्थी, सभासद, कार्यकर्ते व हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# समाजोपयोगी कार्याचा गौरव

## सोलापूर जिल्हा युवा पुरस्कार २०२५-२६ जाहीर

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):–** युवकांमधील सामाजिक बांधिलकी, नेतृत्वगुण आणि समाजोपयोगी कार्याला प्रोत्साहन देण्यासाठी देण्यात येणारा जिल्हा युवा पुरस्कार सन २०२५-२६ जाहीर करण्यात आला आहे. जिल्हा युवा पुरस्कार व युवा महोत्सव समिती, सोलापूरच्या बैठकीत सविस्तर छाननी, गुणांकन व चर्चेनंतर युवक, युवती आणि संस्था या तीन प्रवर्गातील पुरस्कारार्थींची सर्वानुमते निवड करण्यात आली.





**युवक प्रवर्ग :**

मुजम्मील खलील कमलीवाले, पंढरपूर, जि. सोलापूर यांची युवक प्रवर्गातून निवड करण्यात आली आहे. त्यांनी सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य, पर्यावरण तसेच मानवतावादी क्षेत्रात सातत्यपूर्ण कार्य केले आहे. गरजू व वंचित घटकांसाठी आरोग्य शिबिरे, रक्तदान जनजागृती, औषधे व जीवनावश्यक साहित्याचे वितरण, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप, वृक्षारोपण आणि स्वच्छता अभियान अशा विविध उपक्रमांतून त्यांनी समाजसेवा केली आहे. युवकांना सामाजिक कार्याशी जोडण्याबरोबरच सामाजिक सलोखा व राष्ट्रीय एकात्मतेसाठी केलेल्या त्यांच्या बहुआयामी कार्याची दखल घेऊन ही निवड करण्यात आली आहे.

**युवती प्रवर्ग :**

डॉ. चंदाराणी अशोक क्षीरसागर, कुरुल, ता. मोहोळ, जि. सोलापूर यांची युवती प्रवर्गातून निवड करण्यात आली आहे. वैद्यकीय व्यवसायासोबत सामाजिक बांधिलकी जपत ग्रामीण व गरजू नागरिकांना आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याचे उल्लेखनीय कार्य त्यांनी केले आहे. आषाढी यात्रेच्या कालावधीत वारकऱ्यांसाठी आरोग्य तपासणी, औषधोपचार व औषध वितरणासह विविध आरोग्यविषयक उपक्रम त्यांनी राबविले. आरोग्य सेवा, जनजागृती, समाजसेवा आणि राष्ट्र उभारणीतील त्यांच्या योगदानाची दखल घेऊन त्यांची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

**संस्था प्रवर्ग :**

जाणता राजा बहुउद्देशीय शिक्षण प्रसारक मंडळ, कोंडी, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर यांची संस्था प्रवर्गातून निवड करण्यात आली आहे. संस्थेने शिक्षण, महिला सक्षमीकरण, समाजातील दुर्बल घटकांसाठी कार्य, आपत्ती व्यवस्थापन, क्रीडा, पर्यावरण, आरोग्य तसेच युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविले आहेत. विविध समाजोपयोगी क्षेत्रांमध्ये सातत्याने केलेल्या बहुआयामी व व्यापक कार्याची दखल घेऊन संस्थेची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

**दि. १५ ऑगस्ट २०२६ रोजी स्वातंत्र्य दिनी सोलापूर येथे पुरस्कार वितरण**

या पुरस्काराचे वितरण दि. १५ ऑगस्ट २०२६ रोजी स्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रमात सोलापूर येथे करण्यात येणार आहे.

जिल्ह्यातील युवक, युवती आणि समाजोपयोगी कार्य करणाऱ्या संस्थांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन त्यांना प्रोत्साहन देणे तसेच त्यांच्या कार्यातून इतर युवकांना प्रेरणा मिळावी, हा जिल्हा युवा पुरस्कारामागील प्रमुख उद्देश आहे. असे तालुका क्रीडा अधिकारी राहुल गायकवाड यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये कळविले आहे.

# तेलबिया अंतर्गत काढणी पश्चात पायाभूत सुविधा व फ्लेक्झी घटकांसाठी अर्जाचे आवाहन

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):–** राष्ट्रीय खाद्यतेल अभियान-तेलबिया (NMEO-OS) अंतर्गत सन २०२६-२७ साठी महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाने नवीन कार्यकारी मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. या अभियानांतर्गत तेलबिया उत्पादन वाढविण्यासोबतच काढणीपश्चात होणारे नुकसान कमी करून शेतमालाला मूल्यवर्धन व स्थानिक स्तरावर बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी विविध घटकांमध्ये आर्थिक सहाय्य देण्यात येणार आहे. यासाठी इच्छुक पात्र लाभार्थ्यांनी अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुकाचार्य भोसले यांनी केले आहे.

काढणीपश्चात पायाभूत सुविधा :तेलबियांची काढणी, संकलन व प्रक्रिया अधिक प्रभावी करण्यासाठी या घटकांतर्गत आर्थिक सहाय्य दिले जाणार आहे. तेलबियांची योग्य प्रकारे प्रक्रिया करून तेल काढण्याची क्षमता वाढविणे आणि स्थानिक पातळीवर शेतकऱ्यांना बाजारपेठ उपलब्ध करून देणे हा या घटकाचा उद्देश आहे.

या घटकासाठी वैयक्तिक शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपन्या (FPOs), सहकारी संस्था, मूल्य साखळी भागीदार (VCPs) तसेच नवीन नोंदणीकृत तेल प्रक्रिया उद्योग पात्र आहेत. १० टन प्रतिदिन क्षमतेच्या तेल काढणी युनिटसाठी यंत्रसामग्री व उपकरणांच्या प्रकल्प खर्चाच्या ३३ टक्के किंवा कमाल ९ लाख ९० हजार रुपये, यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढे अनुदान देण्यात येणार आहे. या घटकासाठी इच्छुक लाभार्थ्यांनी तालुका किंवा जिल्हास्तरावर ऑफलाईन अर्ज सादर करावेत. अर्ज करण्याची अंतिम मुदत ३१ ऑगस्ट २०२६ आहे. सोलापूर जिल्ह्यासाठी एक युनिटचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. उद्दिष्टाच्या अधीन राहून जिल्हा तेलबिया अभियान समिती (DOSM) किंवा जिल्हा कार्यकारी समिती (DEC) मार्फत अर्जांची छाननी करण्यात येईल. त्यानंतर तांत्रिक मूल्यांकन करून पात्र अर्जांना मंजुरी देण्यात येईल.

**फ्लेक्झी घटक :**

फ्लेक्झी घटकांतर्गत मिनी ऑइल मिल/एक्सपेलर युनिटसाठी फिल्टर प्रेससह प्रति युनिट कमाल ४ लाख रुपये, तर फिल्टर प्रेसशिवाय प्रति युनिट कमाल ३ लाख रुपये अनुदान देण्यात येणार आहे.

या अनुदानाची मर्यादा अनुसूचित जाती/जमाती, अल्पभूधारक व महिला लाभार्थ्यांसाठी ५० टक्के, तर सर्वसाधारण प्रवर्गासाठी ४० टक्के आहे.

फ्लेक्झी घटकासाठी अर्ज महाडीबीटी (MahaDBT) पोर्टलवर ऑनलाइन पद्धतीने करावयाचे आहेत. इच्छुक पात्र लाभार्थ्यांनी अधिक माहितीसाठी संबंधित जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी किंवा तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा.

राष्ट्रीय खाद्यतेल अभियान-तेलबिया अंतर्गत उपलब्ध या संधीचा लाभ घेऊन तेलबिया उत्पादक शेतकऱ्यांनी काढणीपश्चात प्रक्रिया व मूल्यवर्धनासाठी आवश्यक पायाभूत सुविधा उभाराव्यात. या अभियानामुळे तेलबिया उत्पादक शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होऊन देश खाद्यतेल उत्पादनात आत्मनिर्भरतेकडे वाटचाल करण्यास मदत होईल, असा विश्वास कृषी विभागाने व्यक्त केला आहे.

# माळेवाडी (अ) येथे श्री संत शिरोमणी सावता माळी महाराज यांचा संजीवन समाधी सोहळा संपन्न

**अकलूज (कटूसत्य वृत्त):–** माळशिरस तालुक्यातील माळेवाडी-अकलूज येथे संत शिरोमणी सावता माळी महाराज यांच्या ७३१ वी संजीवन समाधी सोहळा मोठ्या उत्साहात व भक्तीमय वातावरणात संपन्न झाला.सकाळपासून विविध धार्मिक कार्यक्रम आयोजन करण्यात आले होते.



सकाळी संत सावता माळी यांच्या मंदिरातील महापूजा व दुपारची आरती तेजस जालिंदर फुले यांच्या हस्ते करण्यात आली.

दुपारी कीर्तनकार ह.भ.प.धनंजय महाराज गुरव धोंडेवाडी (झी टॉकीज फ्रेम) याचे सुश्राव्य किर्तनाने श्रोते मंत्रमुग्ध झाले होते.त्या नंतर प्रजापिता ब्रह्माकुमारीस ईश्वरीय विश्व विद्यालय माउंट आबू राजस्थान शाखा अकलूज व भारत सरकार यांच्या वतीने १० कोटी नशा मुक्त अभियाना अंतर्गत व्यसन मुक्ती ची प्रतिज्ञा करण्यात आली. ब्रह्माकुमारी शिवरात्री बहेनजी व प्रीति बहेनजी यांनी प्रतिज्ञा करून घेतली व ध्यानधारणाचे महत्व सांगितले.यावेळी क्लास वन वैद्यकीय अधिकारीपदी डॉ. अमेय फुले व सोलापूर विद्यापीठात एम.एससी. इलेक्ट्रॉनिक्स विषयात प्रथम क्रमांक आल्याबद्दल संजीवनी शंकर बनकर यांचा सत्कार प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते शाल हार व श्रीफळ देवून सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमास अकलूज कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मदनसिंह मोहिते-पाटील, अकलूज नगरपरिषदेच्या पहिल्या नगराध्यक्षा सौ. रेश्माताई अडगळे,नगरपरिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी सचिन पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य जालिंदर भाऊ फुले, विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन प्रकाशराव शंकरराव एकतपुरे,नगरसेवक नामदेव नाना गलांडे,नगरसेविका सौ.स्वाती राजेंद्र फुले,नगरसेवक अझरुद्दीन शेख,महर्षी शंकरराव मोहिते-पाटील साखर कारखान्याचे संचालक भारत आप्पा फुले, सामाजिक कार्यकर्ते लालासाहेब अडगळे, अशोकराव जावळे, डॉ. अमोल माने शेंडगे, ज्ञानेश्वर फुले, महादेव फुले, राजेंद्र बनकर, नरूटे सर, माऊली फुले, उमेश फुले व अकलूज माळेवाडी परिसरातील माळी समाजाचे बांधव उपस्थित होते.तसेच सावतामाळी विद्यालय माळेवाडी व जिल्हा परिषद शाळा माळेवाडीतील मुले-मुली सहभागी झाले होते. या कार्यक्रमाचे आयोजन संत सावता माळी ट्रस्ट व समस्त माळेवाडी ग्रामस्थ यांनी केले होते.

महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# शहरात सार्वजनिक ठिकाणी अतिक्रमण करु नये

## मुख्याधिकारी महेश रोकडे यांच्या सूचना

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):–** आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी एस कार्तिकेयन यांच्या आदेशान्वये आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ आणि महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम, १९६५ मधील तरतुदीच्या अधिन राहुन पंढरपूर शहरातील सार्वजनिक रस्ते, फुटपाथ तसेच नगर परिषदेच्या मोकळ्या जागे वरील अतिक्रमणे विशेष अतिक्रमण निर्मूलन पथकाद्वारे काढण्यात आलेली आहेत. सदर ठिकाणी पुन्हा अतिक्रमण केल्यास कोणतीही पुर्व सूचना न देता अतिक्रमण काढण्यात येईल अशा सूचना मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी दिल्या.

आषाढी यात्रा कालावधहीत वारकरी भाविकांना तेसच नागरिकांना वाहतुकीचा कोणताही अडथळा येऊ नये यासाठी पंढरपूर शहरात अतिक्रमण मोहिम राबविण्यात आली होती. आषाढी वारीनंतर शहरातील ज्या ठिकाणावरील अतिक्रमणे पथकाद्वारे काढून टाकण्यात आलेली आहेत व सदरची जागा अतिक्रमण मुक्त केलेली आहे. अशा ठिकाणी परत अतिक्रमण धारकांकडून नव्याने व्यवसायासाठी खोकी व कायम स्वरूपी शेड टाकून अतिक्रमण करणेत येत असल्याचे दिसून येत आहे.

शहरातील सार्वजनिक रस्त्यावर, फुटपाथवर, न.प. जागेवर नव्याने अतिक्रमण करणाऱ्यांना सूचित करण्यात येते की, आपले अतिक्रमण पंढरपूर नगरपरिषदेमार्फत कोणतीही सूचना न देता पोलीस बंदोबस्तात विशेष अतिक्रमण पथकाद्वारे काढून घेण्यात येईल व या दरम्यान होणाऱ्या नुकसानीस नगरपरिषद जबाबदार असणार नाही. ती संबधितांची वैयक्तिक जबाबदारी राहणार आहे.

तसेच कारवाई दरम्यान सार्वजनिक सुरक्षिततेस बाधा आणलेस अथवा सदर प्रकरणी सरकारी कामात अडथळा निर्माण केल्यास संबंधितांवर आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ अन्वये कायदेशीर कारवाई करणेत येईल. तरी पंढरपूर शहर अतिक्रमण मुक्त व सुरक्षित ठेवून सर्व नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे व आपले अतिक्रमण स्वतःहून काढून घ्यावे, असे आवाहनही मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी केले आहे.

# धोकादायक कॉर्नरवर गतिरोधकासाठी उमरडकरांचा एल्गार; १५ ऑगस्टला रस्ता रोको

**करमाळा (कटूसत्य वृत्त):–** कुंभेज फाटा ते रामवाडी या रस्त्यावर उमरड परिसरातील धोकादायक ठिकाणी गतिरोधक उभारण्यात यावेत, या मागणीसाठी उमरड ग्रामस्थांच्या वतीने १५ ऑगस्ट २०२६ रोजी स्वातंत्र्यदिनी रस्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे. बहुजन संघर्ष सेनेचे जिल्हाध्यक्ष तथा आदिनाथ सहकारी साखर कारखान्याचे संचालक राजाभाऊ कदम यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

उमरड परिसरातील कुंभेज फाटा ते रामवाडी रस्त्यावर गतिरोधक उभारण्याच्या मागणीसाठी गेल्या दोन महिन्यांपासून सार्वजनिक बांधकाम विभाग, करमाळा येथील उपअभियंत्यांकडे पत्रव्यवहार करण्यात आला आहे. तसेच मागणी मान्य न झाल्यास आंदोलन करण्याचा इशाराही देण्यात आला होता. मात्र, अद्याप संबंधित ठिकाणी गतिरोधक उभारण्यात आले नसल्याने ग्रामस्थांनी रस्ता रोको आंदोलनाचा निर्णय घेतल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

उमरड येथील कोठावळे शॉपिंग सेंटरजवळ रस्त्यावर धोकादायक कॉर्नर असून, याच ठिकाणाहून एका बाजूला पूर्व सोगावच्या दिशेने, तर दुसऱ्या बाजूला उमरड गावातील बाजार तळाच्या दिशेने रस्ता जातो. या परिसराच्या जवळच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा असल्याने विद्यार्थी व नागरिकांचीही या मार्गावर मोठी वर्दळ असते. त्यामुळे या ठिकाणी गतिरोधक उभारण्याची मागणी करण्यात आली आहे.



तसेच चौधरी वलटे वस्ती परिसरात रस्ता बोगद्यातून जात असून, त्याठिकाणी मोठा कॉर्नर आहे. या परिसराच्या जवळ जिल्हा परिषद शाळा असून, बोगद्यातून पोंधवडीच्या दिशेने जाणारा रस्ताही आहे. त्यामुळे या ठिकाणीही वाहनांचा वेग कमी करण्यासाठी गतिरोधक उभारण्यात यावा, अशी ग्रामस्थांची मागणी आहे.

निवेदनानुसार, या दोन्ही ठिकाणी यापूर्वी अपघात झाले असून त्यामध्ये पाच जणांचा मृत्यू झाला आहे. तसेच दोन जणांच्या पायांना दुखापत होऊन फ्रॅक्चर झाले असून, त्यांच्यावर सध्या रुग्णालयात उपचार सुरू असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, विजय सोनवणे यांच्या घरावर सिमेंट खडी घेऊन जाणारा दहा चाकी टिपर पलटी झाल्याची घटनाही घडली आहे. परिसरातील अपघातांच्या पार्श्वभूमीवर उमरड ग्रामस्थांमध्ये नाराजी असून, रस्त्यावरील धोकादायक ठिकाणी तातडीने गतिरोधक उभारण्याची मागणी करण्यात आली आहे.

या मागणीसाठी १५ ऑगस्ट रोजी उमरड येथे रस्ता रोको आंदोलन करण्यात येणार असल्याचे राजाभाऊ कदम यांनी सांगितले आहे.

या संदर्भातील निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, करमाळा तहसीलदार, करमाळा पोलीस निरीक्षक, सार्वजनिक बांधकाम विभाग अकलूज तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग, उपविभाग करमाळा यांना देण्यात आल्या आहेत. ग्रामस्थांच्या मागणीवर संबंधित प्रशासनाकडून काय कार्यवाही केली जाते, याकडे आता उमरड ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

# दहिगांव जैन मंदिरात झालेल्या चोरी संदर्भात पोलीस प्रशासनास निवेदन

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):–** दहिगांव, ता. माळशिरस येथे दि. ५ च्या रात्री ते ६ ऑगस्ट रोजी पहाटेच्या दरम्यान झालेल्या चोरीच्या घटनेचा तातडीने सखोल तपास करून आरोपींना अटक करून चोरीस गेलेला धार्मिक ऐवज शक्य तितक्या लवकर हस्तगत करण्यात यावा याबाबत नातेपुते येथील श्री १००८ चंद्रप्रभु दिगंबर जैन मंदिर ट्रस्टच्या वतीने नरेंद्र गांधी, बाहुबली चंकेश्वरा, महावीर दोशी, अमृतलाल गांधी, दहिगांव जैन मंदिर ट्रस्टी उदंत शहा यांनी नातेपुते पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विशाल वायकर यांना निवेदन दिले.



या देण्यात आलेल्या निवेदनामध्ये म्हणण्यात आले आहे की, श्री १००८ महावीर स्वामी दिगंबर जैन अतिशय क्षेत्र, दहिगांव, ता. माळशिरस, दि. ५ च्या रात्री ते ६ ऑगस्ट रोजी पहाटे या कालावधीत अज्ञात चोरट्यांनी मंदिरामध्ये प्रवेश करून चोरीची गंभीर घटना घडवून आणली आहे.सदर घटनेमध्ये मंदिरातील ३ चांदीच्या मूर्ती, चांदीचे छत्र, सोन्याचा मुलामा दिलेला कळसाचा बेस तसेच दानपेटी व काचेची दानपेटी फोडून त्यामधील रोख रक्कम असा ५ ते ८ लाख किमतीचा मौल्यवान ऐवज चोरीस गेलेला आहे. ही घटना अत्यंत गंभीर असून, धार्मिक स्थळाच्या सुरक्षिततेबाबत तसेच परिसरातील कायदा व सुव्यवस्थेबाबत चिंता निर्माण करणारी आहे. चोरीस गेलेल्या वस्तूंमध्ये धार्मिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या वस्तूंचा समावेश असल्याने या घटनेमुळे संपूर्ण जैन समाजाच्या धार्मिक भावना दुखावल्या गेल्या आहेत.तरी श्री १००८ चंद्रप्रभु दिगंबर जैन मंदिर ट्रस्ट, नातेपुते यांच्या वतीने पोलीस प्रशासनाला नम्र विनंती करण्यात आहे की, सदर प्रकरणाचा तातडीने, सखोल व सर्व बाजूंनी तपास करून अज्ञात आरोपींचा शोध घेण्यात यावा. मंदिर परिसर तसेच आजूबाजूच्या भागातील सीसीटीव्ही फुटेज, संभाव्य ये-जा मार्ग, संशयित व्यक्ती तसेच चोरीस गेलेल्या वस्तूंच्या विक्री अथवा विल्हेवाटीच्या अनुषंगाने आवश्यक ती चौकशी करण्यात यावी. व चोरीस गेलेल्या चांदीच्या मूर्ती, छत्र व इतर धार्मिक वस्तू स्थानिक अथवा इतर ठिकाणच्या सराफ बाजारामध्ये विक्रीस अथवा वितळण्यासाठी आणल्या जाण्याची शक्यता लक्षात घेऊन संबंधित सराफ व्यावसायिकांना आवश्यक त्या सूचना पोलीस प्रशासनाकडून देण्यात याव्यात.तसेच सदर गुन्ह्यात सहभागी असलेल्या व्यक्तींना लवकरात लवकर ताब्यात घेऊन कायदेशीर कारवाई करण्यात यावी व चोरीस गेलेला धार्मिक ऐवज शक्य तितक्या लवकर हस्तगत करण्यात यावा, ही नम्र विनंती नातेपुते येथील श्री १००८ चंद्रप्रभु दिगंबर जैन मंदिर ट्रस्टच्या वतीने करण्यात आली असून धार्मिक स्थळांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने भविष्यात अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी दहिगांव परिसरात आवश्यक ती पोलीस गस्त व प्रतिबंधात्मक उपाययोजना वाढविण्याबाबतही योग्य ती कार्यवाही करण्यात यावी या आशेचे निवेदन जैन मंदिराचे ट्रस्टी व पदाधिकारी यांच्या वतीने पोलीस प्रशासनाला देण्यात आले आहे.

# २०१ रोजंदारी, बदली कर्मचाऱ्यांना कायम करण्यास 'स्थायी' ची मंजुरी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या सोलापूर महापालिकेतील रोजंदारी आणि बदली कर्मचाऱ्यांच्या कायम सेवेच्या प्रश्नाला अखेर मुहूर्त मिळाला आहे. महापालिकेत सध्या कार्यरत असलेल्या २०१ रोजंदारी व बदली कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्याच्या प्रस्तावाला स्थायी समितीने सोमवारी मंजुरी दिली.

स्थायी समितीच्या मंजुरीनंतर हा प्रस्ताव ऑगस्ट महिन्यातील सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यात येणार असून, महासभेची मान्यता मिळाल्यानंतर तो शासनाच्या मंजुरीसाठी पाठविला जाणार आहे. त्यामुळे अनेक वर्षांपासून कायम सेवेच्या प्रतीक्षेत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. महापालिका स्थायी समितीची सभा सभापती रंजिता चाकोते यांच्या अध्यक्षतेखाली कौन्सिल हॉलमधील क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले सभागृहात झाली. या सभेत एकूण नऊ विषयांना मंजुरी देण्यात आली.

**१९९५ नंतर तात्पुरत्या नियुक्त्या**

महापालिकेच्या विविध विभागांमध्ये १९९५ नंतर रोजंदारी आणि बदली पद्धतीने कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या होत्या. शहराची हद्दवाढ झाल्यानंतर मनुष्यबळाची कमतरता निर्माण झाली. त्यामुळे आरोग्य, नगरअभियंता, सार्वजनिक आरोग्य अभियंता तसेच उद्यान विभागात मोठ्या प्रमाणावर तात्पुरत्या स्वरूपात कर्मचारी नियुक्त करण्यात आले.

या कर्मचाऱ्यांची सुरुवातीला २५७ जणांची यादी तयार करण्यात आली होती. त्यातील मृत, सेवानिवृत्त, दीर्घकाळ गैरहजर तसेच न्यायालयीन आदेशानुसार कायम झालेले कर्मचारी वगळल्यानंतर सध्या २०१ कर्मचारी कार्यरत असल्याचे स्पष्ट झाले.

**१५६ कर्मचाऱ्यांसाठी पदनिर्मितीची गरज**

उपलब्ध कायम पदांचा आढावा घेतल्यानंतर विविध संवर्गांमध्ये प्रवर्गनिहाय ४५ कायम पदे रिक्त असल्याचे निदर्शनास आले. उर्वरित १५६ कर्मचाऱ्यांना कायम करण्यासाठी १५ अधिसंख्य आणि १४१ कायमस्वरूपी पदांची निर्मिती करावी लागणार आहे.

या पार्श्वभूमीवर २०१ कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्याच्या प्रस्तावाला स्थायी समितीने मंजुरी दिली असल्याची माहिती सभापती रंजिता चाकोते यांनी दिली. दरम्यान, रोजंदारी व बदली कर्मचाऱ्यांना कायम करण्यासाठी कर्मचारी संघटनांकडून गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने पाठपुरावा केला जात होता. स्थायी समितीच्या मंजुरीमुळे त्यांच्या प्रयत्नांना यश आले आहे.

**महापालिकेवर ७.२५ कोटींचा अतिरिक्त भार**

२०१ रोजंदारी व बदली कर्मचाऱ्यांना कायम केल्यानंतर त्यांच्या वेतनापोटी महापालिकेवर दरवर्षी ७ कोटी २५ लाख ७७ हजार २४८ रुपयांचा अतिरिक्त आर्थिक भार पडणार आहे. प्रस्तावात याचा स्पष्ट उल्लेख करण्यात आला आहे.